रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १९ • अंक ८५
www.ramprahar.com

• सोमवार, १२ ऑक्टोबर २०२६ • पाने ८ • किंमत ₹२

## पुण्यात महायुतीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले



**पुणे :** पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या दोन दिवसीय दौऱ्याने महायुतीत उत्साह निर्माण झाला आहे. या दौऱ्यात कार्यकर्त्यांच्या भव्य संमेलनातून पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. स्मिता जाधव व शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या प्रचाराचा नारळ फुटला. चव्हाण यांनी पुणे शहर, ग्रामीण, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांच्या कोअर कमिटीचा आढावा घेतला. मतदार नोंदणी तीव्र करणे, बूथनिहाय सूक्ष्म नियोजन व प्रचार यंत्रणा राबवण्याच्या सूचना दिल्या. दोन्ही जागांवर महायुतीचा विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त करीत कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आवाहन केले.

## अंतरंग

वसुंधरा पायी दिंडीचे जंगी स्वागत/३

पंचायतराज अभियानात खालापूरचा डंका!/५

पन्हळघर धरणाला सिंचनाची घरघर/७

# केंद्र सरकारकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना भरघोस मदतीची ग्वाही

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर असून शेतपिके हिरवी दिसत असली तरी त्यातून उत्पादन मिळण्याची शक्यता नाही. पाण्याचे स्रोत आटू लागल्याने जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे, असे सांगताना केंद्राच्या दुष्काळ पाहणी पथकातील अधिकाऱ्यांचेही डोळे भरून आले. राज्यातील गंभीर परिस्थितीची कल्पना असून केंद्राच्या माध्यमातून भरघोस मदत देण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही पथकाने राज्य सरकारला दिली.

एल निनोच्या प्रभावामुळे राज्यात अभूतपूर्व दुष्काळ निर्माण झाला असून सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे, तर आणखी ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पाठवलेल्या अधिकाऱ्यांच्या पथकाने गेल्या चार दिवसांत राज्याच्या विविध भागांतील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर रविवारी (दि. ११) वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा केली.



### पिण्याच्या पाण्याला प्राधान्य

मुंबई-पुण्याला काही दिवस झालेल्या पावसाचा लाभ झाला असला तरी ग्रामीण भागातील लहान गावांतील जलस्रोत आटले आहेत. तेथे मोठ्या प्रमाणावर टँकर लावावे लागणार आहेत. टँकर पुरवठ्यात तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पाणी पोहचवण्याचा आराखडा तयार होत आहे. ऑगस्ट २०२७ पर्यंत उपलब्ध पाण्याचे पहिले आरक्षण पिण्यासाठी करण्यात आले असून नागरिक आणि पशुधनासाठी स्वतंत्र तरतूद केल्यानंतरच अन्य वापरासाठी पाणी दिले जाईल.

बैठकीस आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, केंद्रीय पथकाचे प्रमुख संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांसह केंद्रीय पथकातील सदस्य उपस्थित होते.

केंद्रीय पथकाच्या तीन तुकड्यांनी अहिल्यानगर, सोलापूर, जालना, बीड, धाराशिव, वाशिम, यवतमाळ आदी जिल्ह्यांतील गावांमध्ये शेती, पाणीसाठ्याची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. विशेषतः मराठवाड्यातील परिस्थिती अत्यंत गंभीर असून पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची भीती पथकाने व्यक्त केली. राज्याने सविस्तर प्रस्ताव पाठवावा, महाराष्ट्राला जास्तीत जास्त मदत मिळवून देऊ, अशी ग्वाही केंद्रीय अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुढील सहा ते आठ महिने शेतकऱ्यांना आधाराची गरज आहे. यासाठी रोजगारनिर्मिती, गरजूंपर्यंत अन्नधान्य, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पशुधनासाठी चारा-पाणी याचे सूक्ष्म नियोजन सुरू आहे. केंद्रीय पथकाने तळागाळापर्यंत जाऊन पाहणी केल्याने नागरिकांमध्ये आपल्या अडचणी समजून घेतल्याचे समाधान निर्माण झाले आहे. मान्सूनच्या पहिल्या दोन महिन्यांत चांगला पाऊस झाल्याने विक्रमी उत्पादनाची अपेक्षा होती, मात्र पिके फुलोऱ्याच्या अवस्थेत असतानाच दोन महिने पावसाने खंड दिला. त्यामुळे सोयाबीनला सर्वाधिक फटका बसला, तर कापूस, तूर, ऊस ही पिकेही बाधित झाली. पाण्याअभावी रब्बीची पेरणी होण्याची शक्यता कमी असून उन्हाळी पिकांनाही वाव नाही. खरीपचे नुकसान भरून काढण्याची संधीही यंदा नाही. शेतमजुरीवर अवलंबून असलेल्या लहान शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचे संकट आहे.

### जलस्रोत पुनरुज्जीवन व चाऱ्याचे नियोजन

केंद्र-राज्याच्या योजनांतून जलसाठ्यातील गाळ काढणे, दुरुस्ती आणि पुनरुज्जीवनाची कामे मोठ्या प्रमाणावर घेतली जाणार आहेत. यापूर्वी २५ हजार गावांतील कामांमुळे १५ ते १७ टक्के पाणी तूट असतानाही दिलासा मिळाला होता. ही कामे सॉफ्टवेअर आणि ॲपद्वारे पारदर्शकपणे केली जाणार आहेत. सध्या विविध जिल्ह्यांत ९० ते १२० दिवस पुरेल इतका चारा साठा आहे. पाणलोट क्षेत्रात चारा उत्पादन वाढवले जाईल. उपलब्ध चारा शासनाच्या घोषित दराने खरेदी करून साठवणूक केली जाईल. गरज भासल्यास अन्य राज्यांतूनही चारा आणला जाईल. पशुधनासाठी चारा छावण्या आणि पशू छावण्यांचा पर्याय वापरला जाईल.

# खोपोलीत राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे शानदार उद्घाटन

## पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते शुभारंभ | आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**खोपोली : प्रतिनिधी**

जीवनात सातत्याने मेहनत केल्यास यश नक्कीच मिळते. त्यामुळे खेळाडूंनीही आपले कला कौशल्य दाखवून यश संपादित करावे, अशा शुभेच्छा रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी खोपोली येथे राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनावेळी दिल्या.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



क्रीडा व युवा सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड यांच्या माध्यमातून तसेच रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ, विक्रम साबळे फाउंडेशन आणि कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोली येथे राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे शानदार उद्घाटन रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते आणि भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

कार्यक्रमास आमदार महेंद्र थोरवे, रायगड कुस्ती संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, खोपोली नगरपालिकेचे नगराध्यक्ष कुलदीप शेंडे, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, उपविभागीय अधिकारी डॉ. विशाल नेहुल पाटील, पनवेल पंचायत (पान २...)

## नितळसच्या कुस्ती संकुलाचा गुरुकुल पुरस्काराने सन्मान



महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग आणि विक्रम साबळे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा २०२६-२७ च्या भव्य सोहळ्यात लोकनेते रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुल नितळसला (पनवेल) मानाचा रायगडच्या कुस्तीचे गुरुकुल हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. (पान २...)

## निवडक

### राजगडावर पर्यटकाचा तीव्र उन्हामुळे चक्कर येऊन मृत्यू

**खडकवासला :** राजगडावर पर्यटनासाठी आलेल्या ३४ वर्षीय जिज्ञेश खंडाळकर नामक पर्यटकाचा पाली दरवाजाजवळ चक्कर येऊन मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना १० ऑक्टोबरला घडली. तीव्र उन्हामुळे चक्कर आल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. जिज्ञेश मित्रांसह किल्ला पाहण्यासाठी आले होते. त्यांना उपचारासाठी वेल्हे ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकारी डॉ. कुरणकर यांनी त्यांना मृत घोषित केले.

### मुंबईतील सायन रुग्णालयात निवासी डॉक्टरची आत्महत्या

**मुंबई :** सायन रुग्णालयातील निवासी डॉक्टर शिवचरण पाटील याने ॲनस्थेशियाचा ओव्हरडोस घेऊन जीवन संपवल्याची घटना शनिवारी समोर आली. वसतिगृहातील बाथरूममध्ये मृतदेह आढळल्यामुळे सायन रुग्णालयात खळबळ उडाली आहे. शिवचरण पाटील सर्जरी विभागात पदव्युत्तरच्या पहिल्या वर्षाचे शिक्षण घेत होता.

## नवरात्रोत्सवानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घेतले देवींचे दर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घटस्थापनेपासून नवरात्र उत्सवाला उत्साहात सुरुवात झाली आहे. यानिमित्त कोपर आणि शिवाजीनगर येथे श्री देवीची भावपूर्ण वातावरणात प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी येथील पूजा मंडपांना सदिच्छा भेट देत देवीचे मनोभावे दर्शन घेऊन आरती केली तसेच सर्वांच्या सुख, समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली.



दरम्यान, यावेळी भारतीय जनता पक्षाचे शिवाजीनगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, उपाध्यक्ष व्ही. के. ठाकूर, टी. के. ठाकूर, पी. के. ठाकूर, भाऊ कडू, शिवाजी ठाकूर, पी. एन. ठाकूर, नारायण ठाकूर, भास्कर पाटील, किशोर ठाकूर, जरीमरी माता नवरात्री मंडळ अध्यक्ष विनोद कडू, कार्याध्यक्ष राम ठाकूर, नितीन ठाकूर, सौरभ ठाकूर, राकेश कडू, जितेंद्र कडू, सुदीप ठाकूर, सुरेश ठाकूर, रमेश ठाकूर, उमेश ठाकूर, विक्रम ठाकूर, वैभव ठाकूर, राजेंद्र ठाकूर, कल्पेश ठाकूर, शिवाजीनगर महिला मंडळाच्या नंदा ठाकूर, शुभांगी कडू, विनंती ठाकूर, मनीषा ठाकूर, आशा म्हात्रे, कुसुम ठाकूर, स्वाती ठाकूर, लता ठाकूर, राजश्री ठाकूर यांच्यासह अनेक स्थानिक मान्यवर, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिपकेंसह तिघांची शांतता राखण्याच्या अटीवर सुटका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



पुढील एक वर्ष शांतता भंग होईल असे कोणतेही कृत्य न करण्याच्या अटीवर कॉक्रोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दिपके, सौरव दास आणि आशुतोष रांका यांची रविवारी (दि. ११) दिल्लीतील कार्यकारी दंडाधिकारी न्यायालयाने सुटका केली. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी नियोजित आंदोलनापूर्वी तिन्ही नेत्यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले होते. दिल्लीमध्ये एअर इंडियाचे विमान उतरल्यानंतर काही वेळातच विमानाच्या आतून त्यांना ताब्यात घेण्यात आले होते.

त्यानंतर त्यांना दिल्ली कॅन्टोन्मेंट येथील अतिरिक्त शहर दंडाधिकारी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. दरम्यान, आंदोलनापूर्वी गुरुग्राम येथील त्यांच्या निवासस्थानातून ताब्यात घेण्यात आलेले यूट्यूबर आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर ध्रुव राठी यांचीही रविवारी पहाटे सुटका करण्यात आली.

## पनवेल-कर्जत लोकल लवकरच दृष्टिक्षेपात

**मुंबई : प्रतिनिधी**



प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर, जलद आणि सोयीस्कर होण्यासाठी पनवेल ते कर्जत लोकल सुरू केली जात आहे. या प्रकल्पाचे काम वेगात सुरू असून लवकरच हा मार्ग प्रवाशांच्या सेवेसाठी सुरू केला जाणार आहे. येत्या डिसेंबर महिन्यात हा मार्ग वाहतुकीसाठी सुरू करण्यासाठी रेल्वे प्रशासनाच्या हालचाली सुरू आहेत. मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून एमयूटीपी-३ अंतर्गत पनवेल-कर्जतदरम्यान दुहेरी रेल्वेमार्गिकेचे काम सुरू करण्यात आले आहे.

सध्या प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून यासाठी तब्बल दोन हजार ७८२ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात या रेल्वेमार्गावर दररोज ५० लोकल धावणार आहेत. यामुळे प्रवाशांचा पनवेल ते कर्जतपर्यंतचा प्रवास अधिक जलद होणार आहे.

**पाच रेल्वे स्थानके**

पनवेल-कर्जतदरम्यान दुहेरी रेल्वे मार्गिकेवर पनवेल, चिखले, पोयंजे, चौक आणि कर्जत अशी पाच स्थानके उभारण्यात आली आहेत. तसेच तीन बोगदे, पाच उड्डाणपूल आणि १६ भुयारी मार्ग उभारण्यात आले आहेत. दरम्यान, पनवेल-कर्जत रेल्वेमार्ग प्रवाशांच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे सुरू करण्यासाठी सध्या तांत्रिक चाचण्या घेतल्या जात आहेत.

## राज्यातील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना शुल्कमाफी विचाराधीन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांना राज्य सरकारने यंदा परीक्षा शुल्कमाफी दिल्यानंतर पुढील वर्षीही दुष्काळ कायम राहिल्यास विद्यार्थ्यांना प्रवेशावेळी १०० टक्के शुल्कमाफी देण्याचा विचार केला जाईल, असे आश्वासन उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहे. गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्यास सरकार नेहमीच सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एका विशेष मुलाखतीत ते बोलत होते.



### मंत्री चंद्रकांत पाटील यांचे संकेत

महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील विद्यार्थी निवडणुका पुन्हा सुरू करण्याबाबत राज्य सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि प्राध्यापकांशी चर्चा करून ही समिती अहवाल सादर करेल. विद्यार्थी निवडणुकांमधील हिंसाचार, पैशांचा वापर आणि गुन्हेगारी प्रवृत्ती यांसारख्या जुन्या समस्यांचा विचार करूनच निर्णय घेतला जाईल, असेदेखील मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले.

सीईटी परीक्षेतील कथित गैरव्यवहाराचे आरोप बिनबुडाचे असल्याचे सांगत चंद्रकांत पाटील यांनी परीक्षा पारदर्शक असल्याचा दावा केला. विशेष तपास पथकाच्या चौकशीत परीक्षा पारदर्शक झाल्याचे निष्पन्न झाल्याचे त्यांनी नमूद केले. बारावीच्या गुणांचा विचार प्रवेशासाठी पात्रता निश्चित करण्यापुरताच केला जातो; गुणवत्ता यादीत त्यांना स्वतंत्र वेटेज नसते. त्यामुळे बारावीचे गुण आणि सीईटीचे पर्सेंटाईल यांची तुलना करणे चुकीचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## तुळजापूरची ज्योत आणणाऱ्या तीन तरुणांचा अपघातात मृत्यू

**तुळजापूर : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर येथून आई तुळजाभवानीची ज्योत घेऊन गावाकडे परतणाऱ्या तरुणांच्या दुचाकीला भरधाव कंटेनरने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात तीन तरुणांचा मृत्यू झाला असून एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. शनिवारी रात्री साडेआठ वाजता बीड-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पिंपळगाव पांढरी परिसरात ही दुर्घटना घडली.



यामुळे खुलताबाद तालुक्यात शोककळा पसरली आहे. गोळेगाव आणि जाफ्राबादवाडी येथील काही तरुण आई तुळजाभवानीची ज्योत आणण्यासाठी तुळजापूर येथे गेले होते. देवीचे दर्शन घेतल्यानंतर ते ज्योत घेऊन गावाकडे निघाले. काही तरुण ज्योत घेऊन धावत होते, तर तेलाचा पुरवठा करणारे दोन तरुण दुचाकीवरून सोबत होते. याच दुचाकीला मागून येणाऱ्या भरधाव कंटेनरने धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकी कंटेनरखाली अडकली आणि कंटेनरने तिला तब्बल पाच किलोमीटरपर्यंत फरफटत नेले.

या अपघातात जाफ्राबादवाडी येथील अक्षय राजपूतचा जागीच मृत्यू झाला. गोळेगाव येथील अमोल औटे आणि गोरख म्हस्कर गंभीर जखमी झाले होते. त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान दोघांचाही मृत्यू झाला.

## आरोग्यमंत्री थेट जनतेच्या भेटीला; १ नोव्हेंबरपासून आरोग्य संवाद यात्रा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकारातून १ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत राज्यव्यापी 'आरोग्य संवाद यात्रा' आयोजित करण्यात येणार आहे. या यात्रेद्वारे आरोग्यमंत्री थेट जनतेशी संवाद साधणार असून आरोग्य सेवांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन त्यातील त्रुटी दूर करण्यावर भर दिला जाणार आहे. आरोग्य योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत कितपत पोहचतो, आरोग्य संस्थांमध्ये कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत आणि रुग्णसेवेत कोणत्या अडचणी येतात याची माहिती



यात्रेदरम्यान घेतली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि दोन ग्रामीण रुग्णालयांच्या कामकाजाची पाहणी करण्यात येणार आहे. यासोबतच आरोग्य उपकेंद्रांपासून जिल्हा रुग्णालये, महानगरपालिका रुग्णालये, मनोरुग्णालये आणि विशेष रुग्णालयांपर्यंतच्या सेवांचाही आढावा घेतला जाणार आहे. लोकसहभाग वाढविण्यासाठी जिल्हा, तालुका, महापालिका आणि ग्रामपातळीवरील आरोग्य समित्यांच्या बैठका स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत आयोजित केल्या जाणार आहेत. बैठकांत आरोग्य संस्थांमधील आवश्यक सुविधा, मनुष्यबळ, औषधांचा पुरवठा, रुग्णसेवेतील अडचणी व शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटी याबाबत सूचना मागविण्यात येतील. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, मोफत डायलिसिस, एमआरआय व सीटी स्कॅन, स्टेमी उपचार, टेलिमेडिसिन, मोफत रक्त तपासण्या, १०२ व १०८ रुग्णवाहिका, जननी सुरक्षा योजना, माहेरघर व मानसिक आरोग्य समुपदेशनसारख्या सुविधांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवली जाईल. संबंधित अधिकारी नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन पात्र रुग्णांना आरोग्य सुविधांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत.

# ‘पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक, गुणवत्ताधारित होणार’

**मुंबई : प्रतिनिधी**

पदव्युत्तर वैद्यकीय व दंतवैद्यकीय अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि गुणवत्ताधारित करण्यासाठी सर्व प्रवेश केंद्रीकृत ऑनलाइन प्रक्रियेद्वारे करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी नव्या नियमांची माहिती घेऊन त्यानुसार प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.



राज्य शासनाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी अधिसूचना जारी करून पूर्णवेळ व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व दंतवैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) नियम, २०२६ अधिसूचित केले आहे.

नव्या नियमांनुसार प्रवेश प्रक्रियेतील संस्थास्तरीय फेरी बंद करण्यात आली आहे. यापुढे संस्थात्मक कोटा आणि अनिवासी भारतीय (एनआरआय) कोट्यातील जागांसह सर्व प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत केंद्रीकृत ऑनलाइन प्रवेश प्रक्रियाद्वारे करण्यात येतील. रिक्त जागांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या स्ट्रे व्हॅकन्सी फेऱ्याही ऑनलाइन पद्धतीनेच पार पडतील.

संस्थात्मक कोट्यातील जागांसाठी उमेदवारांच्या पात्रतेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असलेल्या; मात्र राज्याबाहेरील संस्थेतून पदवी पूर्ण केलेल्या उमेदवारांनाही या जागांसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्राबाहेरील उमेदवार आणि परदेशी वैद्यकीय पदवीधारकांनाही खासगी महाविद्यालयांतील संस्थात्मक कोट्यातील जागांसाठी पात्रता देण्यात आली आहे.

प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांची पात्रता निश्चित करताना नोंदणीची अंतिम तारीख हा कट-ऑफ दिनांक मानण्यात येणार आहे. या तारखेला आवश्यक पात्रता पूर्ण नसलेल्या उमेदवारास संबंधित शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल. नोंदणीच्या अंतिम तारखेनंतर पात्रता प्राप्त झाल्यास ती त्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी ग्राह्य धरली जाणार नाही.प्रवेश प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## मुरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीत ७१ देवींची घटस्थापना

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीत यंदा ७१ देवींची घटस्थापना होणार असून, सर्वत्र नवरात्रोत्सवाची लगबग सुरू झाली आहे. मुरूड शहरातील जुनीपेठ येथील शिवशक्ती क्रीडा मंडळाच्या देवीचे आगमन झाले असून, मंडळाच्या वतीने गेल्या ३५ वर्षांपासून नवरात्रोत्सवाची परंपरा जपली जात आहे.

शिवशक्ती क्रीडा मंडळाची देवी खारअंबोली येथील संदीप मोकल यांच्या मंगलमूर्ती गणपती कारखान्यातून आणण्यात आली आहे. मंडळाच्या देवीच्या पूजेचा मान यंदा सिद्धेश कोलवणकर व त्यांच्या पत्नी अर्पणा कोलवणकर यांना मिळाला आहे. ही पूजा पुरोहित आशिष जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विधिवत करण्यात आली.

गेल्या ३५ वर्षांपासून मंडळाकडून नवरात्रोत्सव उत्साहात साजरा केला जात आहे. यंदाही देवीच्या आगमनामुळे जुनीपेठ परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, नवरात्रोत्सवासाठी मुरुड तालुक्यात भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## कुणबी समाजाच्या उन्नतीसाठी राजकारणापलीकडे जाऊन काम करणार -खासदार सुनील तटकरे

**धाटाव : प्रतिनिधी**

कुणबी समाज म्हणजे बळीराजा! या समाजाने मला गेल्या ४० वर्षांपासून समाजसेवेची संधी दिली. बहुजन समाजाने दिलेल्या पाठबळाची जाणीव ठेवून समाजाच्या उन्नतीसाठी यापुढेही काम करत राहणार आहे. सामाजिक कार्यक्रमांमध्ये राजकारण आणण्यापेक्षा समाजाचे नेतृत्व सक्षम करण्याला माझे प्राधान्य राहील, अशी भूमिका खासदार सुनील तटकरे यांनी कुणबी समाजाच्या वास्तूच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात व्यक्त केली.



कुणबी समाजाच्या कोणत्याही नेत्याला मी आजवर कमी लेखले नाही. उलट, बहुजन समाजाचे नेतृत्व सक्षमपणे उभे राहावे, यासाठी नेहमीच पाठबळ देत आलो आहे आणि यापुढेही देत राहीन, असे स्पष्ट करत तटकरे यांनी समाजाच्या नेतृत्वाबाबतची आपली भूमिका मांडली. समाजाने आपल्याला नेतृत्व करण्याची संधी दिली असून, त्या विश्वासाची जाणीव ठेवून समाजासाठी काम करणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

कुणबी समाजाच्या संघटनेला शंभर वर्षे पूर्ण होत असताना मुंबईसारख्या आर्थिक राजधानीत समाजाच्या वास्तूचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा केल्याचे तटकरे यांनी सांगितले. समाजाच्या वास्तूसाठी पाच कोटी रुपयांचा निधी केवळ जाहीर न करता त्याचा अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख व्हावा, अशी आग्रही मागणी आपण केली होती. त्यानुसार अर्थसंकल्पात समाजाच्या संघटनेचा उल्लेख करण्यात आला आणि निधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला, असे त्यांनी नमूद केले. या प्रक्रियेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

समाजाच्या वास्तूमध्ये महिला बचत गटांच्या उत्पादनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांना बाजारपेठ मिळवून देणे आणि व्यवसायवृद्धीसाठी नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी उर्वरित निधीच्या विनियोगासंदर्भातही चर्चा करून महिलांसाठी उपयुक्त उपक्रम आखता येतील, असे त्यांनी सूचित केले.

वास्तू उभी राहणे हा प्रवासाचा शेवट नसून समाजाच्या आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीची ती सुरुवात असली पाहिजे. महिला, युवक आणि विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवून या वास्तूचा समाजाला दीर्घकालीन लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, आमदार अनिकेत तटकरे, पंचायत समिती सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय माडलुस्कर, महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस विजय पाशिलकर, जिल्हा परिषद सदस्या निधी जाधव, पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, मनोजकुमार शिंदे, विनोद पाशिलकर, शंकर भगत, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विनोद पोटफोडे, रामचंद्र सकपाळ, प्रमोद मसकर, जनार्दन धनावडे, सुनील ठाकूर, अनिल भगत, संतोष खेरटकर उपस्थित होते.

## नेरळ-कळंब मार्गावरील अतिक्रमण स्वतःहून हटवण्यास सुरुवात

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ - कल्याण राज्य मार्गावरील अतिक्रमणांवर १ ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात झाल्यानंतर त्याचा परिणाम आता नेरळ - कळंब राज्य मार्गावरही दिसून येत आहे. कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूंना साडेसात मीटर अंतरातील अतिक्रमणे हटविण्याच्या दिलेल्या सूचनांच्या पार्श्वभूमीवर साई मंदिर परिसरातील सुमारे २०० टपरीधारकांनी स्वतःहून अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली.



नेरळ - कल्याण राज्य मार्गावरील अतिक्रमणांवर प्रशासनाने सुरू केलेल्या कारवाईमुळे अतिक्रमण हटविण्याबाबतची प्रक्रिया अधिक गांभीर्याने घेतली जात असल्याचे चित्र नेरळ - कळंब मार्गावर पाहायला मिळाले. साई मंदिर परिसरात अनेक वर्षांपासून व्यवसाय करणाऱ्या टपरीधारकांनी प्रशासनाकडून कारवाई होण्याची प्रतीक्षा न करता स्वतःहून आपल्या टपऱ्या व इतर अतिक्रमित साहित्य हटविण्यास सुरुवात केली. कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूंना साडेसात मीटर अंतर मोकळे ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संबंधित टपरीधारकांकडून अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीसाठी आवश्यक जागा मोकळी होण्यास मदत होणार असून रस्त्याच्या कडेला असलेल्या अतिक्रमणांमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक अडथळ्यांवरही काही प्रमाणात तोडगा निघण्याची शक्यता आहे.

यावेळी कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती अमर मिसाळ यांनी प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याबाबत दिलेल्या सूचना आणि रस्त्याच्या मध्यापासून निश्चित केलेले अंतर याचे स्वागत केले. प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करत सुमारे २०० टपरीधारकांनी स्वतःहून अतिक्रमणे हटविण्यास सुरुवात केली असल्याचे त्यांनी सांगितले.

## केळवली गावाजवळ चालत्या कारने घेतला पेट

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत-खोपोली मार्गावरील केळवली गावाजवळ आज, रविवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास एका चालत्या कारने अचानक पेट घेतल्याची घटना घडली.

कारने अचानक पेट घेतल्यामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणेथांबवण्यात आली होती. सुदैवाने या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नसल्याचीमाहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच खोपोली अग्नीशामकदलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्नीशामक दलाच्या जवानांनीअथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. आगीमुळे ठप्प झालेली

या मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात मदत यंत्रणांना यश आले असून सध्यारस्ता वाहतुकीसाठी पूर्ववत करण्यात आला आहे.

## नवीन पनवेलच्या नवनाथनगर वसाहतीमधील रस्त्यांचे काँक्रीटीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सभागृह नेते अँड.प्रकाशजी बिनेदार यांच्या पाठपुराव्यामुळे प्रभाग १७ मधील नवनाथ नगर वसाहत रेल्वे स्टेशन रोड पनवेल येथे गल्ल्यांमध्ये कॉक्रिटिकरण करण्याला सुरुवात झाली आहे



पावसामुळे गल्ल्यांमध्ये पाणी आणि चिखल जमा होऊन नवनाथ नगर वसाहत मधील स्थानिक नागरिकांना तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि महिलांना गल्लीतील पाणी आणि चिखलाचा त्रास सहन करावा लागत होता नगरसेवक अँड प्रकाशजी बिनेदार यांनी सतत पनवेल महानगरपालिकेकडे पाठपुरावा करून गल्ल्यांमधील नागरिकांची समस्या सोडविल्या आहेत.

त्यामुळे नवनाथ नगर वसाहतीतील नागरिकांनी नगरसेवक अँड प्रकाशजी बिनेदार यांचे खूप खूप आभार मानले नगरसेवक अँड प्रकाशजी बिनेदार व त्यांचे सहकारी नगरसेवक अँड मनोज भुजबळ, नगरसेविका डॉ अस्मिता घरत, नगरसेविका अँड शिवानी घरत यांचे सुध्दा आभार मानले.

## मुंबई-गोवा महामार्गावरील दुभाजकांवर गवत, झाडांचे साम्राज्य; अपघाताची भीती

**पाली : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी एक नवी आणि गंभीर समस्या समोर आली आहे. महामार्गाच्या दुभाजकांवर (डिव्हायडर) मोठ्या प्रमाणावर गवत, झुडपे आणि झाडी वाढली असून त्यामुळे वाहनचालकांना वाहन चालवतांना अडथळा निर्माण होत आहे.



पावसाळ्यानंतर महामार्गाच्या दुभाजकांवर उगवलेल्या या गवत व वनस्पतींची योग्य वेळी छाटणी न केल्यामुळे हे गवत अत्यंत उंच वाढले आहे. त्यामुळे रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने येणारी वाहने, वळणांवर समोरून येणारी वाहतूक किंवा अचानक रस्ता ओलांडणारे प्राणी व नागरिक वाहनचालकांना वेळेवर दिसत नाहीत. परिणामी, अचानक ब्रेक दाबावा लागल्याने किंवा अंदाज न आल्याने अपघात घडण्याची तीव्र शक्यता निर्माण झाली आहे.

या वाढलेल्या झाडीमुळे विशेषतः रात्रीच्या वेळी आणि तीव्र वळणांवर प्रवास करणे अधिक धोकादायक ठरत आहे. समोरून येणाऱ्या वाहनांच्या दिव्यांचा प्रकाश आणि दुभाजकांवरील झाडीमुळे रस्ता स्पष्ट दिसत नाही. त्यामुळे स्थानिकांसह नियमित प्रवास करणाऱ्या वाहनचालकांमधून तीव्र असंतोष व्यक्त केला जात असून प्रशासनाने हे गवत व झाडी तात्काळ हटवण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने लवकर हे काम पूर्ण करून महामार्गावरील प्रवास सुरक्षित करावा, अशी अपेक्षा आता वाहनचालकांकडून व्यक्त केली जात आहे.

**आम्ही काही दिवसांपूर्वी ड्राईव्ह घेऊन पाहणी केली आहे. पाऊस थांबल्यावर हे सर्व गवत व झाडी काढून साफसफाई करण्यात येणार होती. आता पाऊस गेल्याने हे काम सुरु केले असून लवकरच पूर्ण करण्यात येईल.**

**-रवींद्र इंगोळे, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (NHAI) प्रकल्प संचालक**

## शासकीय वाहनाचे नुकसान

**नवीन पनवेल** : शासकीय वाहनाला धडक दिल्याप्रकरणी चारचाकी चालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पावणेआठच्या सुमारास ब्रेझा कार (एमएच ४६ सीआर ५६६६) चालक यश बांगर याने कोपरा गाव ब्रिजजवळ बस स्टॉपसमोर भरधाव वेगाने आणि सुरक्षित अंतर न ठेवता वाहन चालवून शासकीय वाहनाला (एमएच ४३ सीजी ७१९५) मागील बाजूस धडक दिली.

## कर्करोग जनजागृतीसाठी खोपोली-अलिबाग कार रॅली

**खोपोली : प्रतिनिधी**

कर्करोग जनजागृतीसाठी खोपोली ते अलिबाग काढण्यात आलेल्या कार रॅलीमध्ये इनर व्हील क्लबच्या माजी अध्यक्ष क्षमा घनश्याम आठवले यांनी सहभाग घेत कार चालवली.

वयाची साठी ओलांडून देखील विविध उपक्रमात सामाजिक कार्यक्रमात आघाडीवर असलेल्या क्षमा आठवले या खालापूर गावातील रहिवासी आहेत.

कोरोना काळात देखील सर्व रुग्णालय खालापूर मधील खाजगी क्लिनिक बंद असताना क्षमा आठवले आणि त्यांचे पती डॉक्टर घनश्याम आठवले यांनी घरोघरी जाऊन कोरोना तपासणी करण्यासाठी पुढाकार घेतला होता.

शिवाय खालापूर मधील कोरोना केंद्रात देखील मोफत सेवा आठवले दाम्पत्यांनी बजावली होती. कर्करोगाचे प्रमाण सध्या प्रचंड प्रमाणात वाढले आहे. कर्करोगाबाबत जनजागृतीसाठी कार वर विविध संदेश लिहून रॅली काढण्यात आली होती.




पान १ वरुन

## खोपोलीत राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे शानदार उद्घाटन

समितीचे सदस्य राजेंद्र पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह अनेक नगरसेवक, नगरसेविका व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे कारमेल स्कूलच्या बँड पथकाने स्वागत केले. या उद्घाटन सोहळ्यात जपान येथे आयोजित स्पर्धेत १० मीटर एअर रायफल शूटिंग प्रकारात रौप्यपदक पटकावणारा पार्थ राकेश माने आणि राज्य व राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदकांची कामगिरी करणारी रायगडची सुवर्णकन्या क्षितिजा जगदीश मरागजे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. याशिवाय रायगडच्या कुस्ती क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल रायगड कुस्ती संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक केले. राज्यस्तरीय स्पर्धेमुळे विविध जिल्ह्यांतील शालेय कुस्तीपटूंना आपले कौशल्य दाखविण्याची, अनुभव मिळवण्याची आणि क्रीडा क्षेत्रातील पुढील वाटचालीसाठी प्रेरणा घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे, असे नमूद करत खेळाडूंनी आपले कला कौशल्य अधिक समृद्ध करून आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवावा, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. आमदार महेंद्र थोरवे यांनीही मार्गदर्शन करून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश मरागजे यांनी, तर आभार क्रीडा शिक्षक राजू कुंभार यांनी मानले.

### नितळसच्या कुस्ती संकुलाचा ‘गुरुकुल’ पुरस्काराने सन्मान

*हा विशेष पुरस्कार रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कुस्ती क्षेत्रातील उत्कृष्ट योगदान आणि खेळाडूंना दिलेले उच्च दर्जाचे प्रशिक्षण याप्रीत्यर्थ हा सन्मान कुस्ती संकुलाला जाहीर झाला आहे. पुरस्कार स्वीकारताना लोकनेते रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुलचे मार्गदर्शक परेश ठाकूर आणि संस्थापक अध्यक्ष पैलवान रुपेश पावशे यांनी उपस्थित राहून पालकमंत्री भरत गोगावले व इतर मान्यवरांच्या हस्ते हा बहुमान स्वीकारला. यावेळी भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे आदी मान्यवर उपस्थित होते.*

## जिंदलच्या बॅडमिंटनपटूंची दुहेरी विजयी भरारी

**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळावच्या बॅडमिंटनपटूंनी जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या मुरूड तालुकास्तरीय स्पर्धेत दुहेरी विजेतेपद पटकावत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला. १७ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील मुलांच्या दोन्ही संघांनी प्रथम क्रमांक मिळवत रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. ११ ऑक्टोबर रोजी ही स्पर्धा झाली.१७ वर्षांखालील गटात प्रखर झा, साईराज कोठावडेकर, स्वराज देसाई आणि अनय कांत यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. तर १९ वर्षांखालील गटात संस्कार साळावकर, वीरसिंग पाटील आणि कार्तिकेय ठाकूर यांनी दमदार कामगिरी करत विजेतेपद मिळवले.



खेळाडूंचे कौशल्य, जिद्द, आत्मविश्वास आणि सांघिक प्रयत्न या यशात महत्त्वपूर्ण ठरले. या दुहेरी विजेतेपदाबद्दल जेईटी प्रमुख डॉ. भावेश भालेराव यांनी खेळाडूंच्या जिद्दीचे आणि सातत्यपूर्ण कामगिरीचे कौतुक केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी हे यश शाळेसाठी अभिमानास्पद असल्याचे सांगत खेळाडूंचे कौतुक केले. उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांनीही सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशामागे क्रीडा विभाग प्रमुख दुर्गाकला सिंग, प्रताप सर आणि वृशाली मॅडम यांचे मार्गदर्शन व परिश्रम महत्त्वपूर्ण ठरले. दोन्ही गटांतील विजेतेपदामुळे जिंदल विद्या मंदिर, साळावच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा अधिक समृद्ध झाली असून आता रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेतही खेळाडू अशीच दमदार कामगिरी करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धासाठी निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड मिळवली आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर मिळवलेल्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्तरांवर आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. प्रतिस्पर्ध्यांना समर्थपणे आव्हान देत त्यांनी पदकांची कमाई केली, तसेच पुढील राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचा मान मिळवला. कुस्ती, जुडो तसेच इतर क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी केलेली कामगिरी त्यांच्या क्रीडाकौशल्याची आणि मेहनतीची साक्ष देणारी आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कु सलाउद्दीन झहीर पटेल याने मुंबई विभागीय स्तरावरील कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले असून, त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कु ओंकार सतिश कौलगे याने मुंबई विभागीय स्तरावरील वुशू स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले असून त्याची राज्यस्तरीय वुशू स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कु समर्थ महेंद्र म्हात्रे याने मुंबई विभागीय स्तरावरील जुडो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले असून त्याची राज्यस्तरीय जुडो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याचप्रमाणे विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनीही विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची कठोर मेहनत, नियमित सराव, क्रीडा शिक्षक प्रविण पाटील यांचे मार्गदर्शन, सहकार्य आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच क्रीडागुणांना वाव देण्यासाठी सातत्याने प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही यश संपादन करावे, यासाठी विद्यालयाकडून आवश्यक मार्गदर्शन केले जाते.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख,संस्थेचे मेंबर ॲडव्होकेट राहुल घरत , सेक्रेटरी डॉ. गडदे, विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निशा नायर, शिक्षकवृंद, क्रीडाशिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. आगामी राज्यस्तरीय स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून विद्यालयाचा आणि संस्थेचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा त्यांना देण्यात आल्या.

# भाजप नेते प्रितम म्हात्रे यांच्या पुढाकारातून महिलांसाठी मोफत थायरॉईड तपासणी

**पनवेल : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सेवाभावी विचारांना अनुसरून भारतीय जनता पार्टीच्या 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत नवरात्रीनिमित्त महिलांच्या आरोग्यासाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था, पनवेल व दीपक क्लिनिकल लॅबोरेटरी यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते १९ ऑक्टोबर २०२६ या नऊ दिवसांच्या कालावधीत महिलांसाठी मोफत थायरॉईड (TSH) तपासणी करण्यात येणार आहे.

संस्थेचे संस्थापक. जे. एम. म्हात्रे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थेचे अध्यक्ष तथा भाजप नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या पुढाकारातून हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे यांच्या नियोजनात या उपक्रमाला दरवर्षी मोठा प्रतिसाद लाभतो.

महिलांमध्ये थायरॉईडसंबंधी आजारांविषयी जनजागृती करणे, वेळेत तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे आणि महिलांना स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. वजनातील चढ-उतार, सतत थकवा जाणवणे, केस गळणे, मासिक पाळीतील अनियमितता यांसारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता आवश्यक आरोग्य तपासणी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भाजप नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी"देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सेवाभावी विचारांना अनुसरून भारतीय जनता पार्टीच्या 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. महिलांचे आरोग्य हा निरोगी कुटुंबाचा पाया आहे. जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून आम्ही सातत्याने विविध आरोग्यविषयक उपक्रम राबवत आहोत.

नवरात्रीनिमित्त महिलांसाठी मोफत थायरॉईड तपासणी आयोजित केली असून, जास्तीत जास्त भगिनींनी याचा लाभ घ्यावा. निरोगी महिला, सक्षम कुटुंब आणि सशक्त समाज हाच आमचा सेवासंकल्प आहे! असल्याचे सांगितले.

### शिबिराचे ठिकाण व वेळ

**११ ते १९ ऑक्टोबर २०२६, सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत, आरोग्य सेवालय, दीपक क्लिनिकल लॅबोरेटरी, शॉप नं. ४, वास्तु श्री सी.एच.एस., प्लॉट नं. ५०/६, महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयासमोर, पनवेल ४१०२०६.**

# वसुंधरा पायी दिंडीचे दक्षिण रायगडमध्ये जंगी स्वागत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जगद्गुरू श्रीमत रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'वसुंधरा पायी दिंडी'चे दक्षिण रायगडमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी परमपूज्य कानिफनाथ महाराजांचे दिंडीत आगमन झाल्याने भाविक, सेवेकरी आणि अनुयायांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

'वृक्ष वाचवा, पर्यावरण वाचवा आणि वसुंधरेचे रक्षण करा' हा संदेश घेऊन हजारो धामयात्री व अनुयायी नाणीजधामच्या दिशेने पायी प्रवास करीत आहेत. अध्यात्म आणि पर्यावरण संवर्धन यांची सांगड घालणाऱ्या या उपक्रमाच्या माध्यमातून समाजात निसर्गाप्रती जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मुंबई पीठाच्या वतीने वसई तालुक्यातील शिरसाड येथून या वसुंधरा पायी दिंडीचा उत्साहात शुभारंभ झाला. वसई ते नाणीजधाम असा सुमारे



५०० किलोमीटरचा प्रवास दिंडीच्या माध्यमातून करण्यात येत असून, सुमारे १६ दिवसांच्या या प्रवासात दररोज २० ते २५ किलोमीटरचे अंतर पार केले जात आहे. या प्रवासादरम्यान विविध गावांमध्ये पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, वृक्षारोपण आणि निसर्गरक्षणाविषयी जनजागृती केली जात आहे.

दक्षिण रायगडमध्ये दिंडीचे आगमन होताच भाविक आणि सेवेकऱ्यांनी फुलांची उधळण, जयघोष आणि भक्तिमय वातावरणात दिंडीचे स्वागत केले. परमपूज्य कानिफनाथ महाराजांच्या आगमनामुळे या सोहळ्याला विशेष आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक, सेवेकरी आणि अनुयायी उपस्थित होते.

येत्या २१ ऑक्टोबर रोजी नाणीजधाम येथे आयोजित जगद्गुरू श्रींच्या जन्मोत्सव वारी उत्सवात या दिंडीचे आगमन होणार आहे. नागपूर (विदर्भ पीठ), तेलंगणा, मराठवाडा, मुंबई, नाशिक, पुणे आणि गोवा अशा विविध भागांतूनही वसुंधरा पायी दिंड्या नाणीजधामच्या दिशेने मार्गस्थ होत आहेत.

आजच्या काळात पर्यावरण संवर्धन आणि निसर्गाचे संरक्षण ही काळाची गरज बनली आहे. अशा परिस्थितीत अध्यात्माच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य 'वसुंधरा पायी दिंडी' करीत आहे. स्वच्छता, वृक्षारोपण, निसर्गसंवर्धन आणि पर्यावरणाविषयी जनजागृती यांना प्राधान्य देत हा उपक्रम पर्यावरण संरक्षणाच्या चळवळीला बळ देणारा ठरत आहे.

'वृक्षांचे संवर्धन करा, निसर्गाचे रक्षण करा आणि वसुंधरेप्रती आपली जबाबदारी ओळखा'हा संदेश देत वसुंधरा पायी दिंडीचा प्रवास भक्ती, सेवा आणि पर्यावरण संवर्धनाच्या त्रिवेणी संगमातून सुरू आहे.

# झंकार नवरात्रोत्सव २०२६; महाविजेत्यासाठी स्कूटर बक्षीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गरबा अगरबा आणि दांडियाच्या तालावर नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी सोसायटी मित्र मंडळ, पनवेलयांच्या वतीने आयोजित करण्यात येणारा झंकार नवरात्रौत्सव यंदा २१ व्या वर्षात पदार्पण करत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर , पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, उद्योजक राजू गुप्ते,नगरसेवक सुमित झुंजारराव यांच्या मार्गदर्शनाखाली गेली एकवीस वर्षे हा नवरात्रोत्सव सातत्याने यशस्वीपणे आयोजित केला जात असून, पनवेलच्या सांस्कृतिक परंपरेतील एक महत्त्वाचा उत्सव म्हणून त्याने आपलीवेगळी ओळख निर्माण केली आहे.यंदाचा झंकार नवरात्रौत्सव २०२६ हा ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान एम.सी.सी.एच. सोसायटी मैदान,पनवेल येथे रंगणार आहे. दररोज सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत गरबा आणि दांडियाच्या ठेक्यावरपनवेलकरांना नृत्याचा मनमुराद आनंद लुटता येणार आहे.

गेल्या दोन दशकांहून अधिक काळ या उत्सवाच्या माध्यमातून नवरात्रोत्सवाची परंपरा जपत नागरिकांना एकत्र आणण्याचे काम सोसायटी मित्र मंडळ करत आहे. दरवर्षी वाढणारा उत्साह, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि आकर्षक आयोजन यामुळे झंकार नवरात्रौत्सवाने पनवेलकरांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. यंदाही उत्सवात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.यंदाच्या उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे ग्रुप डान्स स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेली एक लाख रुपयांहूनअधिक रकमेची रोख पारितोषिके. याशिवाय दररोज १०० विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असून, महाविजेत्यासाठी स्कूटरचे महापारितोषिक ठेवण्यात आले आहे. त्यामुळे नृत्यप्रेमी, तरुणाई आणि कुटुंबीयांमध्ये उत्सवाबाबत विशेष उत्सुकता आहे.

नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून, समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारा आणि सांस्कृतिक एकोपा वाढवणारा उत्सव आहे. याच भावनेतून सोसायटी मित्र मंडळाने गेली २१ वर्षे ही परंपरा जपली आहे.यंदाच्या भव्य आयोजनामुळे पनवेलच्या नवरात्रोत्सवाच्या उत्साहात आणखी भर पडणार असून, गरबा आणि दांडियाच्या रंगात पनवेलकरांना नऊ दिवस आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधी मिळणार आहे.तरी पनवेलकरांनी आपल्या मित्रपरिवारासह आणि कुटुंबीयांसह ङगझंकार नवरात्रौत्सव २०२६मध्ये सहभागी होऊन या उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.



**खारकोपरः जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ खारकोपर यांच्या वतीने नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या उत्सवाचे वे २२ वर्ष आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते देवीची प्राणप्रतिष्ठापना, पूजा आणि आरती करण्यात आली. यावेळी माजी उपसरपंच विजय घरत, सुधीर ठाकूर, वैभव घरत, गणेश भोईर, साईचरण म्हात्रे, दयानंद घरत, काशिनाथ पाटील, भाऊ भगत, अनंता ठाकूर, चिंतामण घरत, भाऊ भोईर, संदीप म्हात्रे, गजानन घरत, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.**

# 'भारत को जानो' स्पर्धेत आरटीपीएस खारघरचे उज्ज्वल यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद, नेरुळखारघर शाखेतर्फे खारघर येथील केंद्रीय विहार कम्युनिटीहॉलमध्ये १० ऑक्टोबर, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'भारत को जानो' स्पर्धेतरामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघरच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून शाळेच्यानावलौकिकात भर घातली.

भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, इतिहास, परंपरा आणि राष्ट्रीय अस्मिता यांविषयीउल्लेखनीय ज्ञानाचे प्रदर्शन करत विद्यार्थ्यांनी कनिष्ठ आणि वरिष्ठ अशा दोन्ही गटांत यशसंपादन केले.कनिष्ठ गटात अभीक शाह आणि चैतन्य डोंगरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. आपल्याउत्कृष्ट ज्ञानासह सांघिक समन्वयाच्या जोरावर त्यांनी ही कामगिरी केली. वरिष्ठ गटातऋजुता चव्हाण आणि मान्यता अनुमोलू यांनी तृतीय क्रमांक मिळवून शाळेला आणखी एकयश मिळवून दिले.

विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या मेहनतीचे, अभ्यासपूर्ण तयारीचे आणि भारताचा गौरवशालीवारसा व सांस्कृतिक विविधता जाणून घेण्याच्या जिज्ञासेचे फलित आहे. अशा स्पर्धांमुळेविद्यार्थ्यांमध्ये देशाभिमान जागृत होतो, राष्ट्रीय जाणीव दृढ होते आणि जबाबदार नागरिकघडविण्यास हातभार लागतो.शाळेच्या प्राचार्या आणि व्यवस्थापनाने यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्याप्रयत्नांचे कौतुक केले.

# वन्यजीव सप्ताहानिमित्त पाणदिवे येथील शाळेत निसर्ग संवर्धनाचा जागर

**उरण : बातमीदार**

वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त पुंडलिक रामा पाटील इंग्रजी माध्यम शाळा, पाणदिवे-उरण येथे फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था, चिरनेर, ता. उरण, जि. रायगड यांच्या वतीने निसर्ग संवर्धनविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात वन्यजीवांचे निसर्गातील महत्त्व, सर्पओळख, सर्पदंशावरील प्रथमोपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना यांसह पर्यावरणाशी संबंधित विविध गंभीर विषयांवर विद्यार्थ्यांशी आणि उपस्थितांशी संवाद साधण्यात आला.

'शून्य सर्पदंश मृत्यू अभियान' हा कार्यक्रमाचा महत्त्वपूर्ण विषय होता. सापांच्या विविध प्रजातींची ओळख, सापांविषयी असलेले गैरसमज दूर करणे, सर्पदंशाच्या घटना टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी आणि सर्पदंश झाल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घेण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन



करण्यात आले. साप आणि इतर वन्यजीव हे पर्यावरणाचा समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे वन्यजीवांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

याशिवाय वातावरणातील बदल, प्लास्टिक प्रदूषणाची वाढती गंभीर समस्या, भविष्यात भेडसावू शकणारी पाणीटंचाई आणि त्यावरील उपाययोजना यांविषयीही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. प्लास्टिकचा वापर कमी करणे, पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि पावसाचे पाणी साठविण्यासारख्या उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली.

संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष जयवंत ठाकूर आणि राकेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून निसर्ग, वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि निसर्ग संरक्षणाची भावना रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका योगीता गुरुनाथ गावंड, प्राची प्रशांत परदेशी, हेमांगी शैलेश गावंड, स्मिता मंगेश जाधव, सुरक्षा अविनाश भोईर आणि मनाली गावंड यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वन्यजीवांचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर यांचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरला.

## संपादकीय

# दुष्काळाशी लढा!

महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक राज्यात दाखल झाले असून शासन-प्रशासकीय पातळीवर युद्धपातळीवर उपाययोजना राबवल्या जात आहेत. अशा बिकट परिस्थितीत केवळ सरकारवर अवलंबून न राहता सर्वांनी एकत्र येऊन बळीराजाच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे.

**महाराष्ट्राला सध्या भीषण दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. कोरडी पडलेली धरणे, तळाला गेलेली भूजल पातळी आणि करपून गेलेली पिके आज राज्यातील ग्रामीण भागाचे विदारक चित्र अधोरेखित करत आहेत. या गंभीर परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आणि नुकसानीचा अचूक अंदाज घेण्यासाठी केंद्रीय पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. या पथकाकडून राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आणि ग्रामीण भागांत फिरून पीक-पाण्याची वस्तुस्थिती जाणून घेतली जात आहे. त्याचवेळी या कठीण काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारकडून निरनिराळ्या उपाययोजना तत्परतेने राबविल्या जात आहेत. अन्नदाता बळीराजाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि त्याला मानसिक व आर्थिक दिलासा देण्यासाठी सरकार सर्वतोपरी कार्यरत आहे. कोरड्या दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांचे मनोबल टिकवून ठेवणे हे सर्वात मोठे आव्हान असते. शेतीचे झालेले नुकसान अतोनात आहे, परंतु अशा वेळी 'शासन आपल्या पाठीशी आहे' हा विश्वास शेतकऱ्यांच्या मनात निर्माण करणे गरजेचे आहे. दुष्काळाचा सर्वाधिक फटका दोन घटकांना बसतो तो एक म्हणजे पिण्याचे पाणी आणि दुसरे म्हणजे जनावरांचा चारा. राज्य शासनाने या दोन्ही आघाड्यांवर काम सुरू केले आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागात पाणीपुरवठा करण्याचे नियोजन केले जात आहे. केवळ मानवासाठीच नव्हे, तर मुक्या जनावरांच्या जिवाचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. शेतकऱ्यांचे पशुधन अर्थात जनावरांना वेळेवर चारा आणि पाणी उपलब्ध करून देण्याची तजवीज प्रशासनाकडून केली जात आहे. शासकीय यंत्रणा सध्या अहोरात्र राबून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करत आहे. दुष्काळासारखे मोठे नैसर्गिक संकट केवळ सरकारी अनुदानावर किंवा प्रशासकीय आदेशांवर पूर्णपणे पेलता येत नाही. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाची साथ आवश्यक असते. आनंदाची बाब म्हणजे, संकटसमयी धावून जाण्याची महाराष्ट्राची जी प्रदीर्घ परंपरा आहे, ती याही वेळी पाहायला मिळत आहे. शासन-प्रशासकीय पातळीवरील प्रयत्नांना बळ देण्यासाठी राज्यातील काही सेवाभावी संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते पुढे आले आहेत. या संपूर्ण दुष्काळ निवारण कार्यात राज्यातील काही मोठ्या देवस्थानांनी घेतलेली भूमिका अत्यंत स्वागतार्ह आणि दिशादर्शक ठरली आहे. धार्मिक कार्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपत या देवस्थानांनी दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आपल्या तिजोऱ्या खुल्या केल्या आहेत. देशातील व राज्यातील मोठे उद्योग समूह, नामांकित कंपन्या व कॉर्पोरेट क्षेत्राकडे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत मोठा निधी असतो. याचा मोठा हिस्सा महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी, जलसंधारणाच्या कामांसाठी व शेतकरी कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी वळवला गेला पाहिजे. 'एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे सर्वांच्या सामूहिक व प्रामाणिक सहकार्याने आपण दुष्काळाच्या भीषण संकटावर यशस्वीपणे मात करू शकू यात शंका नाही. बळीराजाला पुन्हा उभे करणे हेच आज आपले प्रथम आणि अंतिम कर्तव्य असले पाहिजे.**

# स्वच्छतेचा दीप अन् आरोग्याचा प्रकाश



स्वच्छता ही मानवी जीवनातील सर्वात महत्त्वाची सवय आहे. स्वच्छ परिसरात राहणारी व्यक्ती निरोगी राहते. तिचे मन प्रसन्न राहते. तिच्या कामात उत्साह असतो. स्वच्छता म्हणजे केवळ घर झाडणे नव्हे, तर संपूर्ण जीवनशैलीत स्वच्छतेचा अंगीकार करणे आहे. व्यक्तिगत स्वच्छता, घराची स्वच्छता आणि परिसराची स्वच्छता या तिन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. व्यक्तिगत स्वच्छतेपासून सुरुवात करावी. दररोज स्नान करणे, स्वच्छ कपडे घालणे, नखे कापणे आणि दात घासणे या सवयी आरोग्यासाठी आवश्यक आहेत. जेवणापूर्वी आणि स्वच्छतागृहाचा वापर केल्यानंतर हात धुणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या छोट्या सवयींमुळे अनेक आजार टाळता येतात. लहान मुलांना या सवयी लहानपणापासूनच लावाव्यात. शाळांमध्ये हात धुण्याचे महत्त्व समजावून सांगावे.

घराची स्वच्छता राखणे हे प्रत्येक कुटुंबाचे कर्तव्य आहे. घर नियमितपणे झाडून पुसावे. भांडी स्वच्छ धुवावीत. स्वयंपाकघरात स्वच्छता राखावी. अन्न झाकून ठेवावे. पिण्याचे पाणी स्वच्छ भांड्यात साठवावे. घरातील कचरा रोज बाहेर काढावा. ओला आणि सुका कचरा वेगळा ठेवावा. स्वच्छ घरात राहणाऱ्या कुटुंबाचे आरोग्य चांगले राहते. पाहुण्यांनाही स्वच्छ घरात आनंद वाटतो. परिसराची स्वच्छता ही सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या घरासमोरचा रस्ता स्वच्छ ठेवावा. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये. कचरा नेहमी कचराकुंडीतच टाकावा. उद्याने आणि मैदाने स्वच्छ ठेवावीत. नाल्या तुंबणार नाहीत, याची काळजी घ्यावी. परिसर स्वच्छ असेल तर डास आणि माशा यांचा उपद्रव कमी होतो. साथीचे आजार पसरत नाहीत. स्वच्छ परिसरात राहणाऱ्या लोकांचे जीवनमान उंचावते.

कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन ही आजची मोठी गरज आहे. ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करता येते. हे खत बागकामासाठी उपयुक्त ठरते. सुक्या कचऱ्यातील कागद, प्लास्टिक आणि धातू यांचा पुनर्वापर होऊ शकतो. पुनर्वापरामुळे नैसर्गिक संसाधनांची बचत होते. कचरा जाळू नये, कारण त्यातून हानिकारक धूर निर्माण होतो. कचऱ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन केल्यास तो संपत्तीत रूपांतरित होऊ शकतो. प्लास्टिक कचरा ही गंभीर समस्या बनली आहे. प्लास्टिक जमिनीत कुजत नाही. ते नाल्या तुंबवते. जनावरांच्या आरोग्याला हानी पोहोचवते. म्हणून प्लास्टिकचा वापर कमी करावा.

कापडी पिशव्या वापराव्यात. स्टीलच्या बाटल्या वापराव्यात. एकदा वापरून फेकून देणाऱ्या वस्तू टाळाव्यात. प्लास्टिकचा पुनर्वापर करावा. प्रत्येकाने प्लास्टिकमुक्त जीवनशैलीकडे वाटचाल करावी. पाण्याची स्वच्छता आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. दूषित पाण्यामुळे अनेक आजार होतात. पिण्याचे पाणी नेहमी स्वच्छ आणि सुरक्षित असावे. पाणी उकळून किंवा गाळून प्यावे. पाण्याची टाकी नियमितपणे स्वच्छ करावी. विहिरी आणि हातपंप यांच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा. पावसाळ्यात पाणी साचणार नाही, याची काळजी घ्यावी. साचलेल्या पाण्यात डासांची पैदास होते. त्यामुळे आजार पसरतात.

स्वच्छतागृहांचा वापर आणि त्यांची स्वच्छता यांकडे विशेष लक्ष द्यावे. उघड्यावर शौचास जाण्याची प्रथा पूर्णपणे बंद व्हावी. प्रत्येक घरात स्वच्छतागृह असावे. सार्वजनिक स्वच्छतागृहे स्वच्छ ठेवावीत. त्यांचा योग्य वापर करावा. स्वच्छतागृहांच्या स्वच्छतेमुळे अनेक आजारांना आळा बसतो. विशेषतः लहान मुलांचे आरोग्य सुधारते. स्वच्छता ही सभ्य समाजाची ओळख आहे. शाळांमध्ये स्वच्छतेचे धडे द्यावेत. विद्यार्थ्यांनी वर्गखोल्या स्वच्छ ठेवाव्यात. शाळेचा परिसर स्वच्छ ठेवावा. मध्यान्ह भोजनापूर्वी हात धुवावेत. शाळांमध्ये स्वच्छता स्पर्धा आयोजित कराव्यात. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची आवड निर्माण व्हावी. आजचे विद्यार्थी उद्याचे नागरिक आहेत. त्यांच्यात रुजलेली स्वच्छतेची सवय समाजाला स्वच्छ करेल.

बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. दुकानदारांनी आपल्या दुकानासमोरचा परिसर स्वच्छ ठेवावा. ग्राहकांनी कचरा इकडे तिकडे टाकू नये. आठवडी बाजार संपल्यानंतर परिसर स्वच्छ करावा. यात्रा आणि उत्सव यांच्या काळात विशेष स्वच्छता मोहीम राबवावी. स्वच्छ बाजारपेठेत खरेदीचा आनंद द्विगुणित होतो. आरोग्य आणि स्वच्छता यांचा थेट संबंध आहे. अस्वच्छतेमुळे अतिसार, विषमज्वर आणि कावीळ यांसारखे आजार होतात. या आजारांवर उपचारासाठी पैसा आणि वेळ खर्च होतो. पण स्वच्छता राखली तर हे आजार टाळता येतात. प्रतिबंध हा उपचारापेक्षा श्रेष्ठ आहे. स्वच्छतेची सवय म्हणजे आरोग्याची हमी आहे. निरोगी कुटुंब हेच खरे धन आहे.

स्वच्छतेमुळे मानसिक आरोग्यही सुधारते. स्वच्छ घरात मन शांत राहते. कामात एकाग्रता वाढते. पाहुण्यांचे स्वागत आनंदाने करता येते. स्वच्छ परिसरात फिरायला जाणे आनंददायी असते. मुलांना खेळायला सुरक्षित जागा मिळते. ज्येष्ठ नागरिकांना निवांत वेळ घालवता येतो. स्वच्छता ही केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक सुखाचीही गुरुकिल्ली आहे. ग्रामपंचायती आणि नगरपालिका स्वच्छतेसाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. त्या नियमितपणे कचरा संकलन करतात. रस्त्यांची सफाई करतात. नाल्यांची देखभाल करतात. सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था करतात. नागरिकांनी या यंत्रणेला सहकार्य करावे. कचरा वेळेवर आणि योग्य ठिकाणी द्यावा.

करांचा भरणा वेळेवर करावा. प्रशासन आणि नागरिक यांनी एकत्र काम केल्यास स्वच्छतेचे ध्येय नक्कीच साध्य होईल. महिलांचा सहभाग स्वच्छता मोहिमेत मोलाचा ठरतो. महिला बचत गट परिसर स्वच्छता मोहीम राबवतात. त्या घराघरांत स्वच्छतेचा संदेश पोहोचवतात. अंगणवाडी सेविका मुलांना स्वच्छतेच्या सवयी लावतात. शाळांमधील शिक्षिका विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. महिलांच्या नेतृत्वाखाली अनेक गावे स्वच्छतेचे आदर्श बनली आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा. तरुण पिढीने स्वच्छतेत पुढाकार घ्यावा.

महाविद्यालयीन विद्यार्थी स्वच्छता दूत बनू शकतात. त्यांनी वस्त्यांमध्ये जाऊन जनजागृती करावी. समाजमाध्यमांवर स्वच्छतेचे संदेश पसरवावेत. स्वच्छता अभियानात स्वयंसेवक म्हणून सहभागी व्हावे. तरुणांच्या उत्साहामुळे मोहिमेला नवी गती मिळते. त्यांच्या सर्जनशील कल्पनांमधून स्वच्छतेचे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवता येतात. सणासुदीच्या काळात स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. घराची स्वच्छता करण्याची आपली परंपरा आरोग्यदायी आहे. दिवाळीपूर्वी घर स्वच्छ करण्याच्या निमित्ताने अनावश्यक वस्तू काढून टाकाव्यात. त्या गरजूंना द्याव्यात. उत्सवानंतरचा कचरा योग्य प्रकारे विल्हेवाट लावावा. नैसर्गिक रंग आणि पर्यावरणपूरक सजावट वापरावी. सणांचा आनंद स्वच्छतेसह साजरा करावा.

स्वच्छतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान व्हावा. त्यांच्या कार्यातून इतरांना प्रेरणा मिळते. शाळांमध्ये स्वच्छता दूत नेमावेत. गावांमध्ये स्वच्छता समित्या स्थापन कराव्यात. नियमितपणे स्वच्छता आढावा घ्यावा. चांगले काम करणाऱ्यांचे कौतुक करावे. अशा सकारात्मक प्रोत्साहनातून स्वच्छतेची चळवळ अधिक बळकट होईल आणि समाजात नवा आदर्श निर्माण होईल.

शेवटी असे म्हणता येईल की स्वच्छता ही एक जीवनशैली आहे. ती एका दिवसाची मोहीम नसून दररोजची सवय आहे. प्रत्येकाने आपल्या घरापासून सुरुवात करावी. मग परिसर, गाव आणि शहर स्वच्छ होईल. स्वच्छ भारत, निरोगी भारत हे स्वप्न आपण सर्वांनी मिळून साकार करूया. स्वच्छतेचा दीप प्रत्येक घरात नित्य अखंड तेवत राहो हीच आपली प्रतिज्ञा असावी. स्वच्छ सवयी, निरोगी जीवन, आनंदी कुटुंब आणि समृद्ध समाज हेच आपले अंतिम ध्येय असावे.

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोनमध्ये स्टोरेज कमी पडतंय? वापरा 'ही' ट्रिक

जेव्हा तुम्हाला ईमेल पाठवण्यात, गूगल फोटोजमध्ये एखादा फोटो निवडण्यास अडथळा निर्माण होतो. मग तेव्हा आपण नको असलेले फोटो, व्हिडीओ, फाईल्स डिलीट करण्यास सुरुवात करतो.




स्मार्टफोनमध्ये सतत स्टोरेजची समस्या येतेय? बहुतेक स्मार्टफोन आता १२८ जीबी स्टोरेजसह येतात, पण स्मार्टफोनमधील हे स्टोरेज महत्त्वाचे फोटो, व्हिडीओ, फाईल्सने लगेच भरून जातात. पण, आपण सहसा या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. जेव्हा स्टोरेज भरलेले असते, तेव्हा तुम्हाला ई-मेल पाठवण्यात, गूगल फोटोजमध्ये एखादा फोटो निवडण्यास अडथळा निर्माण होतो. मग तेव्हा आपण नको असलेले फोटो, व्हिडीओ, फाईल्स डिलीट करण्यास सुरुवात करतो

फोनमधील स्टोरेजची समस्या सोडवण्यासाठी आम्ही एक खास युक्ती घेऊन आलो आहोत. अण्ड्रॉइड स्मार्टफोनमध्ये अनेक नको असलेले ॲप्सदेखील जास्त स्टोरेज फूल होण्यास कारणीभूत असतात. अनेक इन्स्टॉल केलेले ॲप्स फोनमधील महत्वाची जागा व्यापून घेतात. यातील असे अनेक ॲप्स असतात, जे आपण इन्स्टाल करतो, पण त्याचा वापर करतच नाही.

ॲण्ड्रॉइड युजर्ससाठी, गुगलने एक फीचर सादर केले आहे, जे न वापरलेले ॲप्स आपल्या फोनवरून अर्काइव्ह करतात आणि स्मार्टफोनमधील जागा मोकळी करतात. न वापरलेले ॲप्सचे चिन्ह, युजर डेटा आणि बेसिक फंक्शनलिटी इन्टॅक्टसह युजर्स रिमूव्ह करू शकतात. जेव्हा डिव्हाइसचे स्टोरेज कमी असेल तेव्हा तुम्ही ते पुन्हा ऑटो-अर्काइव्ह करू शकता.

आता या फीचरचा वापर कसा करायचा चला पाहू. मोबाइलमधील प्ले स्टोअरमध्ये जा. प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करा.

यानंतर सेटिंग पर्यायावर क्लिक करा.सगळ्यात वर असणाऱ्या जनरलवर क्लिक करा.

खाली स्क्रोल करा आणि ॲटोमॅटीकली अर्काइव्ह ॲप ऑन करा. एकदा तुम्ही हे फीचर एनेबल केले की, तुमच्या फोनवरील न वापरलेले ॲप्स अर्काइव्ह केले जातील. कोणतीही महत्त्वाची फाईल डिलीट न करता तुम्ही तुमच्या फोनचे स्टोरेज अगदी सोप्या पद्धतीने खाली करू शकता.

# कवयित्री आणि गीतलेखिका शांता शेळके



## निमित्त

शांता शेळके यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ रोजी पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे जनार्दन शेळके यांच्याकडे झाला. शिक्षण हुजूरपागा शाळा व स.प. महाविद्यालय पुणे येथे झाले. त्यांनी नागपुरातील हिस्लॉप महाविद्यालय, मुंबईतील रुईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयांमध्ये मराठीच्या अध्यापिका म्हणून काम केले. आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग'मध्ये उपसंपादक म्हणून पाच वर्षे कार्य केले.

१९३८ मध्ये त्या मॅट्रिक झाल्या आणि पुण्याच्या स. प. महाविद्यालयातून बी. ए. झाल्या. या काळात साहित्याचे सखोल संस्कार त्यांच्यावर झाले. कॉलेजच्या नियतकालिकासाठी त्यांनी एक लेख लिहिला. प्रा. माटे यांच्या त्यावरील अभिप्रायाने त्यांना लेखनासाठी हुरूप आला. हळूहळू त्या कविता, लेख लिहू लागल्या. १९४४मध्ये संस्कृत घेऊन शांताबाई एम.ए. झाल्या. नागपूरचे हिस्लॉप कॉलेज, मुंबईचे रूईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयात त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

१९९६ साली आळंदीमध्ये अखिल भारतीय संमेलनाच्या अध्यक्षपदी त्याने कार्य केले. त्या एक प्रतिभासंपन्न मराठी कवयित्री, प्राध्यापक, संगीतकार, लेखिका, अनुवादक, बाल-साहित्य लेखिका, साहित्यिक आणि पत्रकार होय. अनुवादक, समीक्षा स्तंभ लेखिका, वृत्तपत्र, सह संपादिका म्हणूनदेखील यांचा साहित्यात मोलाचा वाटा आहे. शांताबाई या केंद्रीय फिल्म प्रमाण मंडळ तसेच राज्य नाटक परिनिरीक्षण मंडळाच्या त्या सदस्य म्हणून होत्या. डॉ. वसंत अवसरे या टोपण नावाने त्यांनी गीते लिहिली आहे. त्यांना अनेक कथा, कादंबऱ्या, कविता लिहिल्या आहे. त्यांचे निधन ६ जून २००२ रोजी झाले.

त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित केले आहे. यांच्यावर काही पुस्तके प्रकाशित झाल्या आहे. कविता, गीत, चित्रपटगीत, कथा, कादंबरी, बालसाहित्य अशा विविध साहित्यप्रकारात शांताबाईंची जवळपास शंभर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'वर्षा' (१९४७) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. 'रूपसी' (१९५६), 'तोच चंद्रमा' (१९७३), 'गोंदण' (१९७५), 'कळ्यांचे दिवस', 'फुलांच्या राती' (१९८६), 'जन्मजान्हवी' (१९९०), 'चित्रगीते' (१९९५), 'पूर्वसंध्या' (१९९६), 'इत्यर्थ' (१९९८) हे त्यांचे इतर काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. 'मुक्ता' (१९४४), 'गुलमोहोर' (१९४९), 'प्रेमिक' (१९५६), 'काचकमळ' (१९६९), 'सवाष्ण' (१९७४), 'अनुबंध' (१९८०), 'बासरी' (१९८२), हे कथासंग्रह; 'विझली ज्योत' (१९४६), 'नरराक्षस' (१९४८), 'पुनर्जन्म' (१९५०), 'धर्म' (१९७३), 'ओढ' (१९७५), 'स्वप्नतरंग', 'कोजागिरी', 'मायेचा पाझर', या त्यांच्या कादंबर्‍या आहेत. सौंदर्यदृष्टी, रसिकता, मानवी मनोभूमिका आणि सहजता ही त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये होत.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# केसांची गळती होण्याची ही आहेत कारणे...



आजकाल केस गळण्याची समस्या सार्वत्रिक झालेली आहे. अगदी पौगंडावस्थेपासून ते ८० वर्षांपर्यंतचे रुग्ण केस गळतीसाठी डॉक्टरांकडे येतात. मानवाच्या डोक्यावर साधारणपणे ८० हजार ते एक लाख केस असतात. हे केस मूल जन्मतःच बरोबर घेऊन येते आणि हा आकडा नंतर वाढत नाही. आपले दररोज साधारणतः ५० ते ७० केस त्यांचे आयुष्य संपल्यामुळे गळून पडतात, परंतु त्यांची जागा नवीन केस घेत असतात. त्यामुळे आपल्या डोक्यावरचे केसांचे छप्पर पूर्ववत राहते.

टक्कल पडणे यालाच पॅटर्न हेअर लॉस असे म्हणतात कारण ही केस गळती एका विशिष्ट प्रकारे होत असते. हा प्रकार स्त्रियांमध्येदेखील आढळतो. परंतु त्याचा पॅटर्न वेगळा असतो. पन्नाशीपर्यंत पन्नास टक्के पुरुषांमध्ये, तर सत्तरी पर्यंत ४०% स्त्रियांमध्ये टक्कल पडण्याचा प्रादुर्भाव दिसून येतो. आता तुमच्या लक्षात येईल की, ८० वर्षांच्या आजींचे केस का कमी झाले. पूर्वी ही नैसर्गिक बाब म्हणून स्वीकारली जायची. आजचे आधुनिक स्त्री-पुरुष हे वास्तव स्वीकारताना दिसत नाहीत.

आज टक्कल पडणे हे पन्नाशीच्या आधी आणि तरुण वयात अधिकाधिक प्रमाणात दिसू लागले आहे. काय कारणे आहेत टक्कल पडण्याची? स्त्री आणि पुरुष दोघांच्याही बाबतीत अनुवंशिकता किंवा जीन्सच्या प्रभावामुळे टेस्टोस्टेरॉन या संप्रेरकाचा केसांच्या मुळावर परिणाम होऊन केस हळूहळू पातळ होऊ लागतात आणि कालांतराने समूळ नष्ट होतात.

ताणतणाव, आहारातील बदल, बैठी जीवनशैली यामुळे तरुण मुलींमध्ये अनियमित पाळी, वाढलेले वजन, सतत येणारी मुरमे, गळणारे केस व चेहरा आणि इतर त्वचेवर येणारे जाड केस. ही आहेत पीसीओएसची लक्षणे. पुरुषांमध्ये देखील वाढलेले वजन, ताण-तणाव बैठी जीवनशैली आणि धूम्रपान यामुळे लवकर टक्कल पडण्याची शक्यता असते.

# समृद्ध पंचायतराज अभियानात खालापूर तालुक्याचा डंका!



## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात महाराष्ट्रात खालापूर पंचायत समितीचा द्वितीय क्रमांक आल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गटविकास अधिकारी संदीप कराड व त्यांच्या सहकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. नाशिक येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात हा सन्मान करण्यात आला.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हा महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत सुरू केलेला एक महत्त्वाचा उपक्रम आहे. याचा मुख्य उद्देश ग्रामपंचायतींचा सर्वांगीण, शाश्वत आणि गुणात्मक विकास करणे, पारदर्शक, लोकाभिमुख आणि डिजिटल सेवा पुरवणारे प्रशासन तयार करणे, ग्रामपंचायतींचे आर्थिक स्वावलंबन वाढवणे, सीएसआर आणि लोकवर्गणीचा वापर करून गावचा विकास करणे, पर्यावरण रक्षण, पाणी व्यवस्थापन आणि स्वच्छता मोहिमांची अंमलबजावणी करणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व इतर शासकीय योजनांची प्रभावी सांगड घालणे, गावातील शाळा, अंगणवाड्या आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचा गुणात्मक विकास करणे, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्यायाला प्राधान्य देणे, ग्रामस्थांच्या थेट सहभागातून गावकऱ्यांची चळवळ उभारणे आणि श्रमदानातून विकासाला चालना देणे हा आहे.

याची प्रभावी अंमलबजावणी गटविकास अधिकारी संदीप कराड, सहाय्यक गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी शैलेश तांडेल, विनोद चांदोरकर, विविध विभागांचे अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी ते कर्मचारी यांच्या सक्रिय सहभागाने खालापूर पंचायत समिती करत आहे. संपूर्ण कोकणात फक्त खालापूर तालुकाच यशस्वी ठरला आहे. विशेष म्हणजे ४५ पैकी ४५ ग्रामपंचायतींचे नामांकन झाले होते. ग्रुप ग्रामपंचायत चौक, वडवळ, साजगाव, वडगाव, शिरवली, नारंगी, तांबाटी, आसरे व वासांबे या नऊ ग्रामपंचायतींनी विभागात बाजी मारली. यातील काहींचे नामांकन राज्यस्तरावर जाईल. त्यामुळे हा पुरस्कार प्राप्त झाला. गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी नाशिक जिल्ह्यातही यशस्वी कार्य केले असून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांशी त्यांचा थेट संवाद असतो. त्यामुळेच खालापूर तालुक्याला यश प्राप्त झाले आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर ट्रेलर दरीत कोसळला

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर खोपोली एक्झिटजवळ रविवारी (दि. ११) सकाळी एक ट्रेलर कठड्याला धडकून दरीत पडून भीषण अपघात झाला. या अपघातात चालक गंभीर जखमी झाला आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरून चालक कृष्णा जायभाय (रा. कळंबोली, पनवेल) हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर (क्र. MH ४६ BU ८७४९) माल घेऊन विशाखापट्टणम ते पेणकडे जात असताना तो खोपोली एक्झिटजवळ आला असता चालकाचे ट्रेलरवरील नियंत्रण सुटले. त्याने समोरील कठड्याला जोरदार धडक देऊन ट्रेलर खोल दरीत कोसळला.



या अपघातात ट्रेलरच्या केबिनमध्ये अडकून चालक गंभीर जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, आयआरबी यंत्रणा, हेल्प फाऊंडेशनचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले. ट्रेलरमध्ये अडकलेल्या चालकाला बाहेर काढून प्रथम खोपोली पालिकेच्या रुग्णालयात पाठविण्यात आले, मात्र त्याची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# सागरी सुरक्षा चषक कबड्डी स्पर्धेत पोयनाड पोलीस ठाण्याला दुहेरी मुकुट

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातर्फे आयोजित करण्यात आलेल्या सागरी सुरक्षा चषक २०२६ कबड्डी स्पर्धेत पोयनाड पोलीस ठाण्याने पुरुष व महिला गटाचे विजेतेपद मिळवून दुहेरी मुकुटाचा मान मिळवला. पुरुषांमध्ये वडखळ पोलीस ठाणे तर महिलांमध्ये मांडवा सागरी पोलीस ठाणे उपविजेते ठरले. शनिवारी (दि. १०) अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर झालेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात पोयनाड पोलीस ठाण्याने वडखळ पोलीस ठाण्याचा २९-१३ असा सहज पराभव करून विजेतेपद मिळवले.

महिलांमध्ये पोयनाड पोलीस ठाणे व मांडवा सागरी पोलीस ठाणे यांच्यात अंतिम सामना चुरशीचा झाला. शेवटच्या चढाईपर्यंत रंगलेल्या सामन्यात पोयनाड पोलीस ठाण्याने २०-१९ असा विजय मिळवून विजेतेपद पटकावले. पुरुषांमध्ये श्रीवर्धन पोलीस ठाणे तर महिलांमध्ये दिघी सागरी पोलीस ठाणे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. पुरुषांमध्ये पोयनाड पोलीस ठाण्याचा ऋषिकेश पाटीलला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. वडखळ पोलीस ठाण्याचा मिथून मोकलला उत्कृष्ट चढाईचे तर पोयनाड पोलीस ठाण्याचा सागर पाटीलला उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक देण्यात आले. महिलांमध्ये उत्कृष्ट खेळाडू म्हणून पोयनाडची रश्मी पाटीलची निवड करण्यात आली. मांडवा पोलीस ठाण्याची चैताली म्हात्रेला उत्कृष्ट चढाईचे तर दिघी सागरी पोलीस ठाण्याची नूतन भायदेला उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक देण्यात आले.

आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अलिबागच्या नगराध्यक्ष अक्षता नाईक, अलिबागच्या उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, अलिबाग नगरपरिषदेचे बांधकाम सभापती प्रशांत नाईक, सुरक्षा शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल, अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, राष्ट्रीय खेळाडू संदीप कदम, महाराष्ट्र पोलीस कबड्डी संघाचा माजी कर्णधार संजय मोकल, रायगड पोलीस क्रीडा प्रमुख ऋषिकेश साखरकर, चिंतामणी शिवडीकर, राजेश खर्डे वेसावकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण करण्यात आले.



# पाणीटंचाईवर यशस्वी मात करण्यासाठी व्होल्टासचा पुढाकार; श्रमदानातून वनराई बंधारा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील आपटा ग्रामपंचायत हद्दीतील कोरळ आदिवासी वाडीत गेल्या अनेक वर्षांपासून भेडसावणाऱ्या पाणीटंचाईवर उपाययोजना करण्यासाठी टाटा व्होल्टास इंडियाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. कंपनीच्या सेवा सप्ताहानिमित्त शुक्रवारी ४५ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदान करून कोरळ आदिवासी वाडीत वनराई बंधारा बांधला.

या उपक्रमामुळे पावसाचे पाणी अडवून जमिनीत पाण्याचे पुनर्भरण होण्यास मदत होणार असून स्थानिक नागरिकांना उन्हाळ्यातील पाणीटंचाईपासून काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. व्होल्टास इंडियाच्या सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत (सीएसआर) गेल्या दोन वर्षांपासून ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून कोरळ आदिवासी वाडीत जलसंवर्धन आणि पाणलोट क्षेत्र विकासाची विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. पावसाळ्यात वनराई बंधारे, तर



उन्हाळ्यात गॅबियन बंधारे बांधून पाणी अडविण्याचे काम केले जाते. या प्रयत्नांमुळे पाण्याचा साठा वाढविण्यासोबतच भूजल पुनर्भरणाला चालना देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आदिवासी वाडीपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या पिण्याच्या पाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विहिरीची दुरुस्ती, अनेक वर्षांपासून कोरड्या पडलेल्या कूपनलिकांची दुरुस्ती आणि त्यांच्याभोवती पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती अशी कामेही करण्यात आली आहेत. या उपाययोजनांमुळे पाणी उपलब्धतेत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. व्होल्टासच्या सीएसआर प्रमुख डॉ. जिज्ञासा कुर्लापकर यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीच्या ४५ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदानात सहभाग घेतला. कार्यालयीन कामकाजातून बाहेर पडत या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चिखल-मातीच्या गोण्या भरून वनराई बंधाऱ्याची उभारणी केली. या श्रमदानातून हजारो लिटर पाणी अडविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण काम करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश केवळ पावसाचे पाणी अडविणे नसून पाणलोट क्षेत्रातील भूजल पुनर्भरण वाढवून गावातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुधारणे हा आहे. जलसंवर्धन, वृक्षारोपण आणि स्थानिक समुदायाचा सहभाग यांच्या माध्यमातून कोरळ आदिवासी वाडीतील पाणीटंचाईची समस्या दीर्घकालीन स्वरूपात कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# तळ्याच्या चंडिका देवीचा नवरात्रोत्सव उत्साहात

**तळा : प्रतिनिधी**

निसर्गरम्य अशा तळगडाच्या पायथ्याशी असलेले चंडिका देवी मंदिर हे तळा गावचे प्राचीन श्रद्धास्थान आहे. छत्रपती शिवरायांनी राज्याभिषेकाचे निमंत्रण दिलेल्या या देवीचा नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून या काळात दर्शनासाठी दूरदूरून भक्तगण येत असतात. रायगड जिल्ह्यात सर्वाधिक वतने चंडिका मातेला आहेत. छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत आजही ग्रामदेवतेचा आध्यात्मिक वारसा मोठ्या भक्तिभावाने जोपासला जातो.



येथे चिरंतन मूल्ये जपली जात आहेत. तळ्याची चंडिका देवी ग्रामदेवता आजही नवसाला पावणारी आहे. या मंदिराच्या परिसरात प्रवेश केला की शांती लाभते. समाजातील सर्व स्तरातील नागरिक विषमता विसरून देवीच्या चरणांजवळ येतात. मंदिरात सामूहिक आरती करतात. या मंदिराची भव्यता, शांतता व स्वच्छता यांचा संगम येथे पाहावयास मिळतो. चंडिका माता ही महिषासुरमर्दिनी असून तळा येथील मूर्ती महिषासुराच्या पाठीवर एक पाय देऊन उभी आहे. या मंदिरात पूर्वीपासून नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. नवरात्रोत्सवातील कामे वतनदारांना वाटली जातात. ती ते मोठ्या हौसेने व जबाबदारीने पार पाडतात.

कुंभार घट, माती घेऊन येतो, बुरुड परड्या व पंखा घेऊन येतो. वाणी अठरा प्रकारचे धान्य घेऊन येतो. धान्य पेरली जातात. दिव्यासाठी तेल आणले जाते. यजमान पूजा साहित्य आणतात. मंत्रजागरात घटस्थापना होते. घटाभोवती मातीत धान्य पेरले जाते, घटामध्ये पाणी टाकून त्यावर परडी ठेवतात. शिंप्याने आणलेले वस्त्र परडीवर ठेवल्यावर नारळ ठेवला जातो, नंतर तिळाच्या फुलांची माळ चढवली जाते. त्यावेळी इतर वतनदार उपस्थित राहून आपल्या कामाचा वाटा उचलतात.

दररोज गोंधळाची कवने देवीसमोर म्हटली जातात. आजही सामूहिक यज्ञ केला जातो. नवरात्रात यज्ञ समजून घेतला तर यज्ञाच्या प्राचीन मूल्याची बुद्धिगम्य माहिती समजते. सर्व वतनदार, बलुतेदार यज्ञाचे सामान गोळा करून एकत्र येतात. वैरभाव असेल तर तो दूर होऊन त्यांच्यात मैत्री निर्माण होते.

यज्ञात हवन केल्यानंतर तो शेष भाग प्रसाद म्हणून स्वीकारतात. ही शेकडो वर्षांची परंपरा आजही तळा ग्रामस्थांनी टिकवून ठेवली आहे.


**Government of Maharashtra**
Public Works Department P.W. Division, Panvel
Telephone No. 022-27452778
E-Tender Notice No. 25(Open ONLINE) Year-2026-27
E-mail address:- panvel.ee@mahapwd.gov.in
Fax Number:-022-27467440

Invitation of Request for Proposal (RFP) for Appointment of Expert Architectural and Engineering Consultant for Providing Architectural, GEO Subsoil Exploration, Structural Design, MEP, Green Building, Furniture, Detailed estimation, Preparing Tender Document, Detailed Drawings, Elevation, 3D Views, Walk Through Etc. services and Obtaining commencement of the project of construction of New Rest House at Panvel Dist-Raigad for selection of the Consultant to whom the Project may be awarded

The detailed Tender notice and Request for Proposal (RFP) can be viewed / downloaded from E-Procurement portal http://mahatenders.gov.in. The detailed notice can also be viewed on www.mahapwd.gov.in. The last date of submission of bid shall be on 19.10.2026

The authority reserves the right to accept or rejected all/ any of the offers without assigning any reasons whatsoever. Conditional bid is not accepted.

sd/-
**Executive Engineer**
**P.W. Division Panvel**

क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र-५/C३१७७


# सुधागड तालुक्यात गावरान भाज्यांची आवक वाढली



**पाली : प्रतिनिधी**

वातावरणातील बदल आणि पावसाची कमतरता यामुळे भाजीपाल्याचे उत्पादन घटल्याने पुणे व नवी मुंबईतून येणाऱ्या भाजीपाल्याच्या दरांमध्ये मोठी घसरण आणि चढउतार पाहायला मिळत आहे, मात्र या महागड्या भाजीपाल्याला सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी पिकवलेल्या सेंद्रिय गावरान भाज्यांचा एक स्वस्त, पौष्टिक आणि आरोग्यदायी पर्याय उपलब्ध झाला आहे.

सध्या स्थानिक बाजारात गावरान भाज्यांची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आदिवासी बांधव व स्थानिक शेतकरी डोंगर उतारावर, रानमाळावर आणि घराच्या परसात कोणत्याही रासायनिक खतांचा किंवा किटकनाशकांचा वापर न करता या भाज्या पिकवतात.

आदिवासी महिला बाजारात विक्रीसाठी घेऊन येतात. बाजारात सध्या शिराळे, घोसाळे, कारली, माठ, वांगी, भेंडी, काकडी, दुधी, गवार आणि ठाकरी मिरची मुबलक प्रमाणात दाखल झाली आहे. अवघ्या १५ ते २० रुपये जुडी, वाटा किंवा पाव किलो अशा परवडणाऱ्या दरात या भाज्या मिळत असल्याने ग्राहकांकडून मोठी मागणी होत आहे.


**महाराष्ट्र शासन**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल
पिनकोड - ४१० २०६
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०
ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. २३ (ई-निविदा) सन २०२६-२७

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ३ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १२.१०.२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक १९.१०.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल**

क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र-५/C३१७६



**भरती - सुरक्षा रक्षक**
पगार : रु. 25,000 - रु. 28,000
ड्युटी : 12 तास
वय : 21 ते 50 वर्षे
शैक्षणिक पात्रता
किमान 10 वी पास
पद : सिक्युरीटी गार्ड
पीएफ/ईएसआयसी/बोनस
आठवड्याला 1 दिवस सुट्टी
लोकेशन : अजिवली गाव, पळस्पा फाट्याजवळ पनवेल.
: संपर्क :
8082592990
8082592995

# बांधकामांतील प्रदूषण रोखण्यासाठी नवी मुंबई महापालिकेची नियमावली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

हिवाळ्यात हवेची गुणवत्ता ढासळू नये आणि बांधकामांमधून पसरणाऱ्या धुळीवर नियंत्रण ठेवता यावे, यासाठी नवी मुंबई महापालिकेने बांधकामस्थळांसाठी प्रदूषण नियंत्रणाची नियमावली निश्चित केली आहे. या नियमांनुसार आवश्यक उपाययोजना न करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांचे काम थांबविणे, बांधकामस्थळ सील करणे आणि आर्थिक दंड आकारण्याचा इशारा महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिला आहे. त्यासाठी १० ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली असून, नियमांच्या अंमलबजावणीसाठी बांधकामस्थळांची संयुक्त तपासणी केली जाणार आहे.



बांधकामस्थळांवरील धुळीमुळे हवेच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी आयुक्त डॉ. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वास्तुविशारद, बांधकाम व्यावसायिक, सर्वेक्षक आणि संबंधित घटकांची बैठक झाली. उच्च न्यायालय आणि उच्चस्तरीय समितीच्या निर्देशांनुसार शहरातील बांधकामस्थळांवर प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश या बैठकीत देण्यात आले.

हिवाळ्यात हवेतील प्रदूषणाचा परिणाम लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असलेल्या रुग्णांच्या आरोग्यावर होऊ शकतो. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकांनी पर्यावरणविषयक नियमांचे पालन करावे, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

**बांधकामस्थळी धूळ नियंत्रणासाठी उपाययोजना**

बांधकाम परिसराभोवती ३० फूट उंचीचे संरक्षक आच्छादन उभारणे आणि इमारतीला वरपासून खालपर्यंत हिरव्या जाळीने झाकणे बंधनकारक करण्यात आले आहे. बांधकामस्थळी नियमित पाण्याची फवारणी करणे आणि वाहनांच्या चाकांमुळे रस्त्यावर धूळ पसरू नये यासाठी बांधकाम परिसरातून बाहेर पडणाऱ्या वाहनांची चाके धुण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

धूळ नियंत्रणासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्याऐवजी प्रक्रिया केलेले किंवा अन्य बिगरपिण्यायोग्य पाणी वापरावे लागणार आहे. या नियमांचे उल्लंघन झाल्यास बांधकामाचे काम थांबवून संबंधित जागा सील करण्याची कारवाई केली जाईल, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

**हवेची गुणवत्ता मोजणारे सेन्सर बंधनकारक**

प्रत्येक बांधकामस्थळी हवेची गुणवत्ता मोजणारे सेन्सर बसविणे आणि हवेच्या गुणवत्ता निर्देशांकाची (एक्यूआय) माहिती देणारे फलक लावणे आवश्यक करण्यात आले आहे. यामुळे बांधकाम परिसरातील हवेच्या गुणवत्तेची माहिती नागरिकांना मिळू शकेल.

बांधकाम सुरू करण्याचे प्रमाणपत्र (सीसी) देतानाही प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांची पूर्तता केल्याची कागदपत्रे तपासली जाणार आहेत. बांधकाम व्यावसायिक आणि वास्तुविशारदांचे हमीपत्र सादर केल्याशिवाय प्रमाणपत्र दिले जाणार नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

**संयुक्त तपासणीद्वारे अंमलबजावणी**

नगररचना विभाग आणि विभाग कार्यालयांतील अधिकारी बांधकामस्थळांची संयुक्त पाहणी करणार आहेत. या पाहणीत नियमांचे उल्लंघन किंवा आवश्यक उपाययोजनांमध्ये त्रुटी आढळल्यास काम थांबविणे, जागा सील करणे आणि आर्थिक दंड आकारणे अशी कारवाई केली जाणार आहे.

नियमांची माहिती बांधकाम व्यावसायिक आणि वास्तुविशारदांपर्यंत पोहोचविण्यासाठी क्रेडाई आणि अन्य बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनांच्या सहकार्याने जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. नागरिकांच्या आरोग्याचे आणि शहरातील हवेच्या गुणवत्तेचे संरक्षण करण्यासाठी सर्व संबंधितांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेने बांधकाम व्यावसायिकांना केले आहे.

# नवी मुंबई एपीएमसीतून महत्त्वाची फाईल गायब

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) मुख्यालयातील कार्यालयातून महत्त्वाची फाईल गायब झाल्याप्रकरणी सेवानिवृत्त कर्मचाऱ्याविरोधात एपीएमसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'माझी वैयक्तिक कागदपत्रे आहेत,' असे सांगून कार्यालयातील कपाटातून कागदपत्रे आणि फाईल नेल्याचा आरोप माजी लघुलेखक यशवंत देशपांडे यांच्यावर करण्यात आला आहे. बाजार समितीच्या महत्त्वाच्या प्रशासकीय विषयांशी संबंधित कागदपत्रे गायब झाल्याची चर्चा असल्याने या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. संबंधित फाईल नेमकी कोणत्या विषयाची होती, ती कोणाकडे आहे आणि तिच्यातील माहितीचा गैरवापर झाला आहे का, याचा उलगडा आता पोलीस तपासातून होणार आहे.





देशपांडे हे ३० जून २०२६ रोजी बाजार समितीच्या सेवेतून निवृत्त झाले होते. मात्र, निवृत्तीनंतरही त्यांच्याकडे कार्यालयातील कागदपत्रे, टॅब आणि कपाटांच्या चाव्या असल्याचे तक्रारीत नमूद आहे. बुधवार, ७ ऑक्टोबर रोजी दुपारी पावणेतीनच्या सुमारास ते एपीएमसीच्या प्रशासकीय इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील कांदा-बटाटा बाजार विभागाच्या कार्यालयात आले. त्या वेळी सचिव, सहसचिव आणि प्रशासन अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याचे सांगण्यात येते. देशपांडे यांनी कपाटातील कागदपत्रे काढताना 'माझी वैयक्तिक कागदपत्रे आहेत,' असे सांगितल्याचा आरोप आहे.

दुपारी चारच्या सुमारास ते कार्यालयातून निघून गेल्यानंतर कार्यालयातील एका महत्त्वाच्या फाईलचा शोध घेण्यात आला. मात्र, ती सापडली नाही. शोधाशोध करूनही फाईल मिळाली नसल्याने आणि कारणे दाखवा नोटीस देऊनही ती परत करण्यात आली नसल्याने प्रभारी मुख्य सुरक्षा अधिकारी चक्रधर पवार यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार शुक्रवारी रात्री उशिरा एपीएमसी पोलीस ठाण्यात देशपांडे यांच्याविरोधात कलम ३०५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

गायब झालेल्या फाईलबाबत बाजार समितीच्या वर्तुळात विविध दावे केले जात आहेत. तत्कालीन सभापती आणि बाजार घटकांनी केलेल्या तक्रारी, फळ बाजारातील बहुउद्देशीय इमारत, बाजार क्रमांक एक आणि दोनमधील व्यापाऱ्यांकडून आकारण्यात येणारे सेवा शुल्क तसेच धान्य बाजारातील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाशी संबंधित कागदपत्रांचा उल्लेख होत आहे. मात्र, यापैकी नेमकी कोणती फाईल गायब झाली, याची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

# रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनतर्फे वाहतूक जनजागृती रॅलीचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनतर्फे क्लबच्या अध्यक्षा रोटेरियन कोमल गुंडेवार यांच्या नेतृत्वाखाली १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत वाहतूक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात रोटरी इंटरॅक्ट शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. वाहतूक पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या रॅलीद्वारे नागरिकांना वाहतुकीचे नियम पाळणे, रस्ता सुरक्षेचे महत्त्व आणि सुरक्षित प्रवासाबाबत जागरूक करण्यात आले. या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी या जनजागृती मोहिमेत सहभागी होऊन उपक्रमाला सहकार्य केले.



रस्ते अपघातांना आळा घालणे, वाहतुकीच्या नियमांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित प्रवासाचा संदेश देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांच्या सहभागातून समाजात रस्ता सुरक्षेचा संदेश पोहोचवण्याचा क्लबने प्रयत्न केला. या रॅलीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत सुरक्षित आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश दिला.

# ३०५ झोपड्यांवर पालिकेचा हातोडा

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीगाव परिसरातील सेक्टर-३० येथील केरला भवन समोरील भूखंडावर हायटेन्शन वायरखालील नमुंमपा व सिडकोच्या जागेवर वसलेल्या अनधिकृत झोपडपट्ट्यांवर तोडक कारवाई करण्यात आली.

दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी १४५ व दिनांक ०९ ऑक्टोबर रोजी १६० अशाप्रकारे एकूण ३०५ अनाधिकृत झोपड्या निष्कासित करण्यात आल्या.

या धडक मोहिमेसाठी वाशी विभाग कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी, स्थानिक पोलीस, अतिक्रमण पोलीस, सुरक्षा रक्षक, मजूर कार्यरत होते. ०१ जेसीबी च्या सहाय्याने ही धडक मोहीम राबवण्यात येऊन झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले.

# आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते आई गोवर्धनी मातेचे पूजन

## शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील ऐतिहासिक व पेशवेकालीन पार्श्वभूमी लाभलेल्या बेलापूर किल्ले गावठाण येथील 'श्री क्षेत्र आई गोवर्धनी माता मंदिरात' शारदीय नवरात्रोत्सवाला अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली आहे. श्रीमंत चिमाजी आप्पा यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या व ३०० वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेल्या या पावन मंदिरात घटस्थापना व महाआरतीने नवरात्रोत्सवाची जल्लोषात सुरुवात झाली.



या प्रसंगी स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांनी मंदिरात उपस्थित राहून आई गोवर्धनी मातेचे विधीवत दर्शन घेतले व उपस्थितांशी संवाद साधला. पेशवेकाळात प्राणप्रतिष्ठापना झालेले हे मंदिर नवी मुंबई, मुंबई, ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यातील आगरी-कोळी, सोनार, ब्राह्मण आणि बारा बलुतेदार समाजाची 'नवसाला पावणारी' कुलदेवता म्हणून ओळखले जाते. नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवसापासून 'जय गोवर्धनी माता'च्या जयघोषाने संपूर्ण बेलापूर परिसर दुमदुमून गेला असून पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली आहे.

यंदाच्या उत्सवकाळात लाखो भाविक दर्शनासाठी येणार असल्याने मंदिर व्यवस्थापन, स्थानिक पोलीस प्रशासन आणि कार्यकर्त्यांच्या सहकार्याने सुरक्षेचे व सुलभ दर्शनाचे विशेष नियोजन केले आहे. मंदिर परिसरात रांगेचे व्यवस्थापन, पिण्याचे पाणी व इतर आवश्यक सोयी-सुविधांची पाहणी करून आमदार म्हात्रे यांनी सर्व व्यवस्थेचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

आमदार मंदा म्हात्रे यांनी, ३०० वर्षांचा इतिहास जपणाऱ्या या पावन भूमीत दरवर्षी होणारा हा नवरात्रोत्सव म्हणजे भक्ती, श्रद्धा आणि संस्कृतीचा मोठा जागर असतो. नवरात्रोत्सवाच्या या पवित्र पर्वात आई भगवतीचा कृपाशीर्वाद समस्त नवी मुंबईकरांना व भाविकांना प्राप्त व्हावा, सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्य लाभावे, हीच आईच्या चरणी प्रार्थना करते असे सांगून या सोहळ्यात सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा अस आवाहन केले.



## दुर्गामाता दौड (माळ पहिली)

**पनवेल : शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे. या नवरात्र उत्सवात श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेलमार्फत श्री दुर्गामाता दौड काढण्यात येते. गेली अनेक वर्ष प्रतिष्ठान पनवेलमध्ये दौड काढत आहे. पहिल्या दिवशी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या स्मारकापासून दौडीची सुरुवात करण्यात आली. तिथून हनुमान मंदिर, गावदेवी माता मंदिरामध्ये दौड येऊन तिथे देवीची आरती करण्यात आली व श्लोक घेण्यात आले. नंतर जूने पोस्ट ऑफीस पासून कर्मवीर भाऊराव पाटील चौक आणि नंतर शेवटी पुन्हा महाराजांच्या स्मारकाच्या ठिकाणी येऊन धेयमंत्र घेऊन सांगता करण्यात आली.**









# अभिजात मराठी काव्य सादरीकरण स्पर्धेतून कवितांचा आस्वाद

**नवी मुंबई : बातमीदार**

संत ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यासारख्या प्रतिभावंताच्या साहित्याने ऐश्वर्यसंपन्न असलेल्या मराठी भाषेसाठी प्रत्येकाने आपल्या परीने योगदान दिले तरी ती एकप्रकारे मराठी भाषाप्रेमाची वारी केल्यासारखेच आहे अशा शब्दात मनोगत व्यक्त करीत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी जगाच्या पाठीवर टिकण्यासाठी आज इंग्रजी महत्वाची असली तरी आपल्या भावभावना, विचार, संस्कृती जपण्यासाठी महत्वाची असलेली मराठी भाषा प्रत्येकाने घराघरातून, दैनंदिन व्यवहारातून नियमित वापरली पाहीजे, तिची गोडी वाढविली पाहिजे अशा शब्दात मनोगत व्यक्त केले.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त आयोजित अभिजात मराठी काव्य सादरीकरण स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी उपस्थितांशी मराठी भाषाप्रेमी रसिकांशी संवाद साधला. यावेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व स्पर्धेचे परीक्षक सुप्रसिध्द साहित्यिक ग़ज़लकार विनोद पितळे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी भाषा हे संवादाचे माध्यम असून आपण मराठीतूनच संवाद साधण्याचा आग्रह मनोमनी जपला पाहीजे असे मत मांडत स्वानुभव सांगितले. काव्य सादरीकरण स्पर्धेचे परीक्षण करताना आलेले अनुभव कथन करताना सुप्रसिध्द साहित्यिक ग़ज़लकार विनोद पितळे यांनी मराठीतील उत्तम कविता वाचण्याची स्पर्धा महानगरपालिकेने आयोजित केली ही कल्पनाच पुस्तकांकडे व वाचनाकडे घेऊन जाणारी असल्याचे सांगत कल्पकतेचे कौतुक केले. अभिजात मराठी काव्य सादरीकरण स्पर्धेकरिता अत्यंत उत्साही प्रतिसाद लाभला. नवी मुंबईकर ७१ नागरिक, नमुंमपा अधिकारी कर्मचारी यांनी नाव नोंदणी केली होती, त्यामधील ४७ जणांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून काव्य सादरीकरण केले. त्यामधून परीक्षक विनोद पितळे यांनी अंतिम निकाल जाहीर केला.

प्रथम रूद्राक्ष पातारे,व्दितीय दिलीप गायकवाड,तृतीय पल्लवी देशपांडेउत्तेजनार्थ प्रणय चव्हाण, प्रज्ञा लळींगकर , सोनाली नाईक ,शितल देशपांडे ,सर्जेराव कुईगडे उल्लेखनीय अनुजा खरसंबळे,अमोल वाघमारे.ॲड. निरंत पाटील.विजेत्यांना अनुक्रमे रू. ३ हजार, रू. २५००/-, रू. २ हजार रक्कमेची पारितोषिक ग्रंथभेट स्वरूपात महापौर श्रीम.सुजाता पाटील व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आली. उत्तेजनार्थ ५ सादरकर्त्यांना प्रत्येकी रू. १ हजार किंमतीची पारितोषिके व स्पर्धक संख्या जास्त व सादरीकरण चुरशीचे असल्याने परीक्षकांनी वाढ केलेल्या उल्लेखनीय सादरकर्त्यांना रू. ५००/- रक्कमेची पारितोषिके ग्रंथभेट स्वरूपात वितरित करण्यात आली आहे.

# पन्हळघर धरणाला सिंचनाची 'घरघर'

## ▪ कालवा नसल्याने ५० वर्षांनंतरही हरित क्रांतीचे स्वप्न अधुरे

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील लोणेरे परिसरातील पन्हळघर येथील धरणाला तब्बल पन्नास वर्षांचा कालावधी उलटूनही या प्रकल्पाचा अपेक्षित लाभ शेतकरी आणि ग्रामस्थांना मिळू शकलेला नाही. धरण उभे राहिले, पाणी साठाही झाला. मात्र डावा आणि उजवा कालवा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित न झाल्याने धरणातील पाणी शेती पर्यंत पोहोचण्याचे स्वप्न आजही अधुरेच आहे. सुमारे नऊ कोटी रुपयांहून अधिक खर्च झाल्यानंतरही कालव्या अभावी धरणाचा अपेक्षित उपयोग होत नसल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.



पन्हळघर धरणासाठी ८ सप्टेंबर १९७१ रोजी २२ लाख ८६ हजार ४५३ रुपयांची मातीच्या बंधाऱ्याची योजना आखण्यात आली. त्यानंतर १४ एप्रिल १९७२ रोजी या योजनेला प्रशासकीय मान्यता मिळाली आणि मार्च १९७३ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. जून २००८ पर्यंत धरणाचे बहुतांश बांधकाम पूर्ण झाले. धरणाची लांबी ५९२ मीटर असून उंची सुमारे २० मीटर आहे. सांडव्याची लांबी ६६ मीटर असून धरणात ३.२३ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा करण्याची क्षमता निर्माण झाली. मात्र, धरणाच्या मुख्य बांधकामा नंतरही कालव्यांची कामे पूर्ण न झाल्याने संपूर्ण प्रकल्पाचा उद्देशच बाधित झाला आहे. उपलब्ध माहितीनुसार १ जानेवारी २०१८ अखेर धरणाच्या बांधकामावर ५ कोटी ११ लाख ६२ हजार रुपये, तर आस्थापनेवर ३ कोटी ११ लाख रुपये खर्च झाले होते. म्हणजेच मूळ मंजूर २२ लाख ८६ हजार रुपयांच्या तुलनेत प्रकल्पावर तब्बल ८ कोटी ९३ लाख ६० हजार रुपये खर्च झाले. एवढा मोठा निधी खर्च होऊनही सिंचनाच्या दृष्टीने प्रकल्प अद्याप अपेक्षित क्षमतेने कार्यान्वित झालेला नाही.

या प्रकल्पातून डावा आणि उजवा असे दोन कालवे प्रस्तावित आहेत. डाव्या कालव्याची एकूण लांबी ३ हजार ७३० मीटर असून त्यापैकी केवळ १ हजार ५०० मीटरचे काम पूर्ण झाले आहे. उजव्या कालव्याची लांबी ३ हजार ५३० मीटर असून आतापर्यंत अवघ्या ९०० मीटरचे काम पूर्ण झाले आहे. पुढील भागात वनखात्याच्या जमिनीचा अडथळा असल्याने मंजुरी आणि आवश्यक प्रक्रिया रखडल्याचे सांगितले जाते. कालव्यांची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता असून निधीअभावी कामाला गती मिळत नसल्याची स्थिती आहे.

पन्हळघर खुर्द, पन्हळघर बुद्रुक आणि अंबर्ले या गावांतील शेत जमिनींना बारमाही पाणी मिळावे, या उद्देशाने हा प्रकल्प उभारण्यात आला. या धरणामुळे परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध होऊन भाजीपाला, कडधान्ये तसेच बारमाही पिकांचे उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईल, अशी अपेक्षा होती. धरणासाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनींचे भूसंपादनही करण्यात आले. नदीवर अवलंबून असलेल्या परिसरातील अन्य गावांचाही पाण्याचा प्रश्न या प्रकल्पामुळे सुटेल, अशी अपेक्षा होती. मात्र, पन्नास वर्षांनंतरही धरणातील पाणी शेती पर्यंत पोहोचत नसल्याने या प्रकल्पाची उपयुक्तताच प्रश्नांकित झाली आहे. पावसाळ्यात पाणी उपलब्ध होते. परंतु त्याचा नियोजित पद्धतीने सिंचनासाठी उपयोग होत नसल्याने शेतकऱ्यांना पावसाच्या लहरीवरच अवलंबून राहावे लागत आहे.

धरणातून वाहणारे पाणी नदीपात्रातून पुढे जाते, मात्र त्याचा लाभ नियोजित सिंचन क्षेत्राला पुरेशा प्रमाणात मिळत नाही. या योजनेअंतर्गत २६७ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र अवघ्या ३० हेक्टर क्षेत्रावर सिंचनाची निर्मिती झाल्याची नोंद आहे. म्हणजेच नियोजित सिंचन क्षेत्राच्या तुलनेत प्रत्यक्ष लाभक्षेत्र अत्यल्प राहिले आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या धरणाचा अपेक्षित लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कालव्यांची उर्वरित कामे पूर्ण करणे अत्यावश्यक ठरत आहे.

पन्हळघर खुर्द, पन्हळघर बुद्रुक, अंबर्ले, मांगरूळ, अंबर्लेवाडी, लोणेरे, नवघर, उसरघर, पहेल, पाले, नवघरवाडी, खांडपाले, लाखपाले तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ परिसरातील पाण्याचा प्रश्न या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात सुटू शकतो. या भागात पावसाळ्यात दूषित पाण्याची समस्या निर्माण होत असल्याने पन्हळघर धरणातील पाण्याचा नियोजनबद्ध वापर करून पाणीपुरवठा व्यवस्था उभारल्यास ग्रामस्थांनाही मोठा फायदा होऊ शकतो. या प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्र २.७४ चौरस किलोमीटर असून रब्बी पिकांसाठी २.७३ दशलक्ष घनमीटर पाणी उपलब्ध होण्याचे नियोजन होते. धरणात पाणीसाठा असूनही त्याचा शेती आणि ग्रामस्थांच्या पाणी प्रश्नासाठी अपेक्षित वापर होत नसल्याने हा प्रकल्प नेमका कोणासाठी आणि कशासाठी उभारला, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. निधीअभावी, वनखात्याच्या मंजुरी अभावी आणि कालव्यांच्या रखडलेल्या कामामुळे पन्हळघर धरणाची कोट्यवधींची गुंतवणूक अपेक्षित परिणामा पासून दूर राहिली आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन, कोट्यवधी रुपये खर्च करून आणि पन्नास वर्षांचा कालावधी लोटूनही सिंचनाचे स्वप्न पूर्ण होत नसेल, तर हा केवळ एका धरणाचा प्रश्न राहत नाही. तो नियोजन, निधी वाटप आणि प्रकल्प पूर्णत्वाच्या प्रशासनिक कार्यक्षमतेचा प्रश्न ठरतो. पन्हळघर धरणातील उपलब्ध पाणी साठ्याचा शेती आणि ग्रामस्थांसाठी प्रभावी वापर करण्यासाठी उर्वरित कालव्यांची कामे तातडीने पूर्ण करणे, वनखात्याच्या मंजुरीतील अडथळे दूर करणे आणि आवश्यक निधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. अन्यथा पाण्याने भरलेले धरण आणि तहानलेली शेती, अशी विसंगत परिस्थिती आणखी किती वर्षे कायम राहणार, हा सवाल पन्हळघर परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.पन्हळघर धरण : ५० वर्षांचा प्रवास, कोट्यवधींचा खर्च !

पन्हळघर धरणासाठी ८ सप्टेंबर १९७१ रोजी २२ लाख ८६ हजार ४५३ रुपयांची योजना आखण्यात आली. १४ एप्रिल १९७२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर मार्च १९७३ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. जून २००८ पर्यंत धरणाचे बहुतांश काम पूर्ण झाले. धरणाची लांबी ५९२ मीटर, उंची सुमारे २० मीटर, तर सांडव्याची लांबी ६६ मीटर आहे. धरणाची पाणी साठवण क्षमता ३.२३ दशलक्ष घनमीटर आहे. १ जानेवारी २०१८ अखेर बांधकामावर ५ कोटी ११ लाख ६२ हजार रुपये आणि आस्थापनेवर ३ कोटी ११ लाख रुपये, असा एकूण ८ कोटी ९३ लाख ६० हजार रुपये खर्च झाला. तरीही कालव्यांची कामे अपूर्णच आहेत. प्रकल्पातून २६७ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण करण्याचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात केवळ ३० हेक्टर क्षेत्रालाच सिंचनाचा लाभ मिळत असल्याची नोंद आहे.

डावा कालवा ३ हजार ७३० मीटर लांबीचा असून केवळ १ हजार ५०० मीटर काम पूर्ण झाले आहे. उजवा कालवा ३ हजार ५३० मीटर लांबीचा असून अवघे ९०० मीटर काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कालव्यां साठी सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांचा निधी आवश्यक आहे. धरण पूर्ण होऊनही कालवे अपूर्ण असल्याने पाणीसाठा उपलब्ध असूनदेखील सिंचनाचे स्वप्न मात्र अद्याप अधुरेच आहे.

## चार वर्षे परिश्रम करा, पुढील ४० वर्षे सुवर्णकाळ अनुभवा –प्रमोद म्हात्रे



**पेण : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी सीएफआय युनिट पेणतर्फे धनादेश व स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांचे वाटप नुकतेच सीएफआय कार्यालयात करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी शिवछत्रपती पुरस्कार विजेते कबड्डीपटू प्रमोद म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बारावीनंतर चार वर्षे परिश्रम करा, पुढील ४० वर्षांचा काळ तुमचा सुवर्णकाळ असेल असे सांगितले.

कोणतीही नोकरी छोटी–मोठी नसते. ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी मिळेल ती नोकरी स्वीकारावी. तसेच आई–वडिलांना कधीही विसरू नका, त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवू नका, त्यांची सेवा करणे हे आपले परमकर्तव्य आहे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी पोलीस अधिकारी होण्याचे अपूर्ण राहिलेले स्वप्न सांगताना आपले अनुभव भावूकपणे व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सीएफआयचे डॉ. किशोर देशमुख यांनी केले. प्रायोजित विद्यार्थी डॉ. ओम पाटील आणि स्पर्धा परीक्षा विद्यार्थी साज चंदने यांनी मनोगत व्यक्त केले. उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुंद यांनी विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित करण्याचा सल्ला दिला, तर पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांनी वाचनाचा छंद जोपासण्याचे आणि मोबाईलपासून दूर राहण्याचे आवाहन केले. नगरसेवक नीलकंठ म्हात्रे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना धनादेश व स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला पेण नगरपालिकेच्या सभापती कलावती पाटील, सभापती सुनीता जोशी, नगरसेविका पल्लवी कालेकर, नगरसेवक भूषण कडू यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### वडखळ बोरीफाटा पुलावर भीषण अपघात; पाच जखमी



**पेण : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावर वळखळ हद्दीतील बोरीफाटा फुलावर भरधाव पिकअप टेम्पोने वॅगनआर कारला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात ५ जण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवार दिनांक ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १ :०० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नवेगाव , डोलवी येथील दिनेश देवजी म्हात्रे हे आपल्या वॅगनआर कार क्रमांक एम एच ०६ सी पी २४७३ या मधून मुंबईहून गोव्याच्या दिशेने प्रवास करत होते. याचवेळी मागून येणाऱ्या महिंद्रा पिकअप टेम्पो क्रमांक एम एच ०४ ई सी ३५३० च्या चालकाने अतिवेगाने आणि निष्काळजीपणे गाडी चालवित कारला जोरदार धडक दिली.

## अलिबागच्या 'राम'ला माल्टात मिळाले मायेचे छत्र; शिशुगृहातून नव्या आयुष्याची सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

निरागस बालपणाला मायेची ऊब, प्रेमाचा आधार आणि सुरक्षित भविष्य देणारा हृदयस्पर्शी सोहळा अलिबागमध्ये पार पडला. वात्सल्य ट्रस्ट, मुंबई संचलित अलिबाग येथील शिशुगृहातील 'राम' या चिमुकल्याला युरोपातील माल्टा देशातील दांपत्याने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दत्तक घेतले. एका बालकाला हक्काचे कुटुंब मिळाल्याने शिशुगृहात भावूक वातावरण निर्माण झाले.

या दत्तक विधान सोहळ्याला रायगड जिल्हा परिषदेच्या गटनेत्या मानसी दळवी, अलिबाग पंचायत समितीच्या माजी सदस्या जुईली दळवी–जुईकर आणि संस्थेच्या पदाधिकारी सुचेता पटवर्धन यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

माल्टातील दांपत्याने 'राम'ला प्रेमाने जवळ घेतले, तेव्हा उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. एका चिमुकल्याला आई–वडिलांचे प्रेम, कुटुंबाचा आधार आणि सुरक्षित भविष्य मिळण्याचा हा क्षण सर्वांसाठी भावूक ठरला. 'राम'च्या आयुष्यातील नव्या पर्वाची सुरुवात या सोहळ्याने झाली.

प्रास्ताविकात सुचेता पटवर्धन यांनी वात्सल्य ट्रस्टच्या कार्याची माहिती दिली. अनाथ, निराधार आणि गरजू बालकांना सुरक्षित वातावरण, प्रेमळ संगोपन आणि कायदेशीर दत्तक प्रक्रियेद्वारे कुटुंब मिळवून देण्यासाठी संस्था कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.



## शिक्षक भरतीमुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पवित्रद्वारे १४५ उपशिक्षकांची लवकरच नियुक्ती

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. पवित्र पोर्टलद्वारे यापूर्वी ३५१ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, आता दुसऱ्या टप्प्यात आणखी १४५ उपशिक्षकांची भर पडणार आहे. या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्याने नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. नव्या शिक्षकांमुळे ग्रामीण भागातील शाळांमधील अध्यापन व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात मराठी आणि उर्दू माध्यमांची मिळून ६ हजार ७४३ शिक्षक पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५ हजार ५२६ पदे भरलेली असून, अद्याप १ हजार २१७ पदे रिक्त आहेत. ही शिक्षकांची कमतरता भरून काढण्यासाठी शिक्षण विभागाने पवित्र पोर्टलद्वारे भरती प्रक्रिया सुरू केली आहे.

या प्रक्रियेत मराठी माध्यमातील ४८५ आणि उर्दू माध्यमातील ३५, अशा एकूण ५२० उपशिक्षकांची मागणी करण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात ३५१ शिक्षकांची निवड झाली. आता दुसऱ्या टप्प्यात मराठी माध्यमातील १४३ आणि उर्दू माध्यमातील दोन, अशा १४५ उपशिक्षकांची नियुक्ती होणार आहे. गुरुवारी, ८ ऑक्टोबर रोजी संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाली.

जिल्ह्यात मराठी माध्यमातील १ हजार १३९, तर उर्दू माध्यमातील ७८ पदे रिक्त आहेत. नव्या १४५ शिक्षकांच्या नियुक्तीनंतर रिक्त पदांची संख्या कमी होण्यास मदत होईल. विशेषतः शिक्षकांच्या उपलब्धतेचा प्रश्न असलेल्या शाळांना या भरतीचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. नियुक्तीपत्रे आणि प्रत्यक्ष रुजू होण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी अधिक मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे.

## मुंबईतून चोरीला गेलेली बोलेरो जीप खालापूर पोलिसांनी शोधली

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबईतून चोरीला गेलेली बोलेरो जीप शोधून काढण्यात खालापूर पोलिसांना १० ऑक्टोबर रोजी यश आले आहे. पोलिसांनी चोरीच्या या प्रकरणातील आरोपीसह बोलेरो जीप मुंबई पोलिसांच्या ताब्यात दिली असून खालापूर पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे वाहन चोरीच्या प्रकरणाचा छडा लावण्यात मदत झाल्याने या धाडसी कामगिरीचे कौतुक होत आहे.

मुंबईतील साईट पार्क पोलीस स्टेशनमध्येबोलेरो जीप चोरीला गेल्यानंतर या प्रकरणाची तक्रार १० ऑक्टोबर रोजी दाखल झाली असता याबाबत गुन्हा नोंद करण्यात आला होता. तपास सुरू असताना खालापूर पोलिसांनी पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या आदेशाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल पाटील व पोलीस निरीक्षक प्रदीप रायन्नावार मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके व पोलीस अर्जुन मोरे यांनी योग्य तपास व कारवाई करत चोरीला गेलेली जीप शोधून काढली. तसेच या प्रकरणातील अतुल शिवाजी कांबळे रा.कवठेमहांकाळ, जिल्हा.सांगली या आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी मुंबई पोलिसांच्या स्वाधीन केले.

तर खालापूर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके व पोलीस अर्जुन मोरे यांनी केलेल्या या उल्लेखनीय व धाडसी कामगिरीमुळे वाहन चोरट्यांवर पोलिसांचा वचक असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. खालापूर पोलिसांच्या या तत्पर कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा




























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com